cmyk

## संपादकीय

### सुरक्षा पेक्षा धास्तीच अधिक!

नक्षलवाद किंवा दहशतवाद रोखण्यासाठी महाराष्ट्रात आणि देशात अनेक प्रभावी कायदे सध्या अमलात आहेत. त्या कायद्यांचा काटेकोर वापर करून संबंधितांवर कारवाई करता येणे शक्य असताना पुन्हा नवीन कायद्याची गरज नव्हती. जनसुरक्षेच्या नावाखाली सरकारला विरोध करणाऱ्यांवर दहशत माजवणे हा सरकारचा अंतस्थ हेतू असल्याचाही आरोप केला जात आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–८१ | बुधवार, दि.१६ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये



१२ वी सायन्स उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना बी. टेक. (फूड टेक.) तसेच बी.एस्सी. (ऑनर्स) ॲग्रीकल्चर पदवी घेवून सर्व क्षेत्रात हमखास १००% नोकरीची संधी.
आतापर्यंतच्या उत्तीर्ण सर्व बॅचेसचे १००% प्लेसमेंट
"अ" दर्जा प्राप्त सौ.के.एस.के. (काकू) | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी मान्यताप्राप्त
अन्नतंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालय
म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड - ४३१ १२२
कॉलेज ऑप्शन नंबर - बी. टेक. (फूड टेक.) - १६१७७ आणि बी.एस्सी (ऑनर्स) ॲग्री - ११२१३.
फॉर्म भरताना विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयाचा ऑप्शन एक नंबरला देणे
ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याचा अंतिम दि. १७ जुलै २०२५
प्रवेशासाठी संपर्क कार्यालय :- सागर हाईट्स, बस स्टँड समोर, बीड - ४३१ १२२
संपर्क क्र. :- ९४२००२५०५२ / ९७६३४३४५०४ / ९९७०८४२०१४ / ७५८८०८२०३४ / ९९४१००१२१२


# गैरप्रकारांमुळे पीक विम्याची जुनी योजना बंद!

## पीक विम्यात आता बदल अशक्य; कृषीमंत्री कोकाटेंची विधानपरिषदेत घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मंगळवारी (दि.१५) विधानपरिषदेत पीकविमा योजनेवर जोरदार चर्चा झाली. आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील आणि सदाभाऊ खोत यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा मुद्दा उपस्थित करत पिक विमा योजनेतील बदलांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.**



त्यांनी ट्रिगर पद्धती कमी करण्यामागील सरकारचे उद्दिष्ट आणि स्वतःची विमा कंपनी स्थापन न करण्याबाबत विचारणा केली. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी गैरप्रकारांमुळे जुनी योजना बंद केल्याचे सांगितले आणि आता शेतकऱ्यांच्या थेट भांडवली गुंतवणुकीवर भर देण्याचा निर्णय जाहीर केला. सभागृहात बोलताना रणजीतसिंह मोहिते पाटील म्हणाले की, पूर्वी राज्यात पिक विम्याचे मूल्यांकन चार ट्रिगर पद्धतींवर आधारित होते. मात्र, आता त्यापैकी तीन ट्रिगर काढून टाकण्यात आले आहेत. यामुळे आता फक्त पीक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीवरच विमा दिला जाणार आहे. या बदलामागील ◀◀ पान २ वर

### कृषी मंत्रालयातर्फे विशेष बैठक बोलावणार

सरकार स्वतःची पिक विमा कंपनी स्थापन करणार नाही. जे ट्रिगर काढून टाकले गेले आहेत, ते योग्यच आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. तरीही, योजनेत काही त्रुटी असल्यास किंवा विधानमंडळ सदस्यांचे मत जाणून घेण्यासाठी कृषी मंत्रालयातर्फे विशेष बैठक बोलावण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली. या चर्चेमुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी पीक विमा योजनेची रचना आणि त्यातील बदल यावर अधिक पारदर्शकता आणि सखोल विचार करण्याची गरज असल्याचे अधोरेखित झाले आहे.

## थोडक्यात...

### युतीवर न बोलण्याच्या राज ठाकरेंच्या सूचना

इगतपुरी : येथील मनसेच्या शिबिरात मनसेचे सर्वेसर्वा राज ठाकरे देखील सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यांनी माध्यमांसमोर काय बोलायला हवे आणि काय नको याबाबतही त्यांनी आपल्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना काही सूचना केल्या आहेत. याबरोबरीने त्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत चांगली कामगिरी करण्यासाठी मतदार यांद्यांवर बारीक काम करा, असा सल्ला देखील त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिला. राज ठाकरे यांनी ठाकरे गटासोबतच्या युतीवरबाबतही पदाधिकाऱ्यांना काही महत्त्वाच्या बाबी सांगितल्या आहेत.

### युपीएससीच्या मुख्य परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

पुणे : केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यूपीएससीमार्फत घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांची तयारी करत असलेल्या स्पर्धा परीक्षार्थींसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा मुख्य परीक्षा, २०२५ चे वेळापत्रक अधिकृतपणे जाहीर केले आहे. ही परीक्षा २२ ते ३१ ऑगस्टदरम्यान घेण्यात येणार आहे. २०२५ च्या मुख्य परीक्षेत बसणाऱ्या सर्व यूपीएससी उमेदवारांसाठी हे एक महत्त्वाचे वेळापत्रक आहे. ही परीक्षा दररोज दोन सत्रांमध्ये घेतली जाईल. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. नागरी सेवा मुख्य परीक्षा २२, २३, २४, ३० आणि ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत दोन सत्रांत घेण्यात येणार आहे.

### नवजात बाळाला कपड्यात बांधत गाडीतून बाहेर फेकले

परभणी : पुण्याहून परभणीला जाणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्समध्ये १९ वर्षीय तरुणीने नवजात बाळाला कपड्यात बांधत गाडीच्या बाहेर फेकून दिल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. महिला नुकतीच प्रसूत झाली होती. पाथरी तालुक्यातील देवनांद्रा परिसरात हा प्रकार घडला असून पोलिसांनी ट्रॅव्हल्सचा पाठलाग करत दोघांना ताब्यात घेत महिलेला रुग्णालयात दाखल केले. बाळाचे पालनपोषण न करण्याच्या उद्देशातून नवजात बाळाला काळसर कपड्यात गुंडाळून चालत्या ट्रॅव्हल्समधून फेकून विल्हेवाट लावल्याप्रकरणी गंभीर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. ऋतिका ढेरे आणि अल्ताफ शेख असे दोन्ही आरोपींची नावे आहेत.

### कुष्ठरोग निर्मूलनासाठी होंणार समितीची स्थापना

मुंबई : राज्यातील कुष्ठरोग निर्मूलनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राज्यस्तरीय समिती स्थापन केली जाणार आहे. या समितीत या क्षेत्रात कार्यरत तज्ज्ञ, डॉक्टर, स्वयंसेवी संस्था व व्यक्तींचा समावेश असणार आहे. ही समिती दर तीन महिन्यांनी आपला अहवाल राज्य सरकारला सादर करणार असून, तिच्या शिफारसींमुळे कुष्ठरोग निर्मूलनाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल, असा विश्वास सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानभवन येथे झालेल्या बैठकीत व्यक्त केला.

# बाल मजुरी विरोधी कायदा फक्त कागदावरच

## जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत उभारते बालमजुराच्या श्रमावर



**बीड /छ.सभाजीनगर । प्रतिनिधी ।**

राज्यामध्ये बाल कामगाराकडून शारीरिक श्रमाची कामे करून घेणे हा कायद्याने गुन्हा आहे आणि बाल मजुरी विरोधी कायदा देखील अस्तित्वात आहे परंतु बीडमध्ये हा कायदा फक्त कागदावरच असल्याचे दिसत आहे बीड जिल्हा अधिकारी आणि तहसील कार्यालयाची मध्यवर्ती इमारत नव्याने उभी राहत आहेत या कामावर मात्र बहुतांशी बालमजूर असल्याचे दिसत आहेत चक्क कायद्याचे नियम दाखवणाऱ्या अधिकाऱ्यांचीच इमारत आणि ◀◀ पान २ वर

### कंत्राटदारावरच गुन्हा दाखल करावा?

जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत आणि तहसील कार्यालयाची मध्यवर्ती इमारत या दोन्हीही इमारतीचे बांधकाम एकाच कंत्राट दाराकडे असल्याची माहिती आहे प्रामुख्याने या कंत्राटदाराने बाहेरील राज्यातील मजूर आणले असले तरी यामध्ये वीस वर्षे आणि अठरा वर्षा च्या मधील काही कामगार काम करत आहेत त्यामुळे अशा अल्पवयीन कामगाराकडून श्रमाची कामे करून घेणाऱ्या कंत्राट दारावर कारवाई केली पाहिजे.

### अधिकारी कर्मचाऱ्यांना हे दिसत नाही का

बीड शहरातील या दोन्ही इमारती महत्त्वाच्या आहेत याच इमारतीच्या आजूबाजूला प्रमुख अधिकाऱ्यांची कार्यालय देखील आहेत जिल्हाधिकारी निवासी उपजिल्हाधिकारी यासह अन्य उपजिल्हाधिकारी तहसीलदार नायब तहसीलदार यासह अन्य कर्मचारी नियमितपणे शासकीय कामावर कार्यरत असतात अशावेळी त्यांना हे कामगार दिसत नाहीत का असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## झेडपीचे वासुदेव सोळंके, मोकाटे यांच्या बदल्या



**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेचे अतिरिक्त सीईओ वासुदेव सोळुंके यांची छत्रपती संभाजीनगर येथे तर पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानोबा कोकाटे यांची किनवट येथे बदली करण्यात आली सोळंके यांच्या जागी पवार तर मोकाटे यांच्या जागी सिंधुदुर्ग येथून किशोर काळे हे नियुक्त करण्यात आले आहेत.**

गेल्या चार ते पाच वर्षापेक्षा अधिक काळ जिल्हा परिषदेचे अतिरिक्त सिओ म्हणून वासुदेव सोळुंके यांनी कार्यभार सांभाळला होता त्यांच्या कार्य काळामध्ये ◀◀ पान २ वर

# भूमाफियांचे काळे कारनामे आ.संदीप क्षीरसागरांनी सभागृहात केले उघड

## बीड शहरातील आरक्षित भूखंडावर प्लॉटींग करून अब्जावधींचा घोटाळा



**बीड नगरपरिषद अंतर्गत सर्वे नंबर २९ तरफ माळी सर्वे नंबर १९४ तर बलगुजर सर्वे नंबर १९७ १९८ १९९ तरफ खोड सारडा रेसिडेन्सी व इतर, सर्वे नंबर ३४ ३५ ६८ ६९ ७९ तरफ गिराम, सर्वे नंबर १७३ तरफ बलगुजार, सर्वे नंबर ५३ सर्वे नंबर ५६ ५९ सर्वे नंबर १८८ तरफ पिंगळे, सर्वे नंबर १६ सर्वे नंबर १७ तरफ देशमुख सर्वे नंबर १५१ सर्वे नंबर १५२ तर बोबडे या सर्वे नंबर मध्ये भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात आरक्षित असलेले भूखंड विक्री केले आहेत.**

**मुंबई । प्रतिनिधी**

नगरपालिका प्रशासन, नगर रचना विभाग आणि रजिस्ट्री कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून भ्रष्टाचार करत बीड मधील भूमाफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शहरातील प्लेग्राउंड असो की मंदिर अथवा गार्डन किंवा महिला स्वच्छतागृह या सगळ्यांसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर प्लॉटिंग करून या भूमाफियांनी कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवत अब्जावधींचा घोटाळा केला आहे. यामध्ये सर्वसामान्य नागरिक आणि शासनाची मोठी फसवणूक झाली आहे. बीड विधानसभा ◀◀ पान २ वर

# शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमन बहिरचे पुत्रप्रेम

## नियुक्ती रद्द करा ; वेतन वसूल करण्याचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील शिक्षकांची शान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या. बीड चे चेअरमन श्रीराम बहिर यांनी संस्थेचे नियम पायदळी तुडवून पुत्रप्रेमापोटी त्यास थेट वरिष्ठ लिपिक पदी नियुक्ती दिली खरी पण सदर नियुक्ती ही नियमबाह्य असून चेअरमन यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन दिलेली नियुक्ती तात्काळ रद्द करुन वेतन व भत्ते वसूल करण्याचे आदेश एस.बी.घोडके उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी दिले आहेत.**



शहरातील हनुमान मंदिर शाहूनगर भागात छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या. बीड ही सहकारी संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम नोंदणीकृत असून या संस्थेतील कर्मचाऱ्याचे रिक्त पद भरणे बाबत ३० ऑक्टोबर २०२३ रोजी नोटीस काढून १ नोव्हेबर २०२३ रोजीच्या ठराव क्रमांक ११ नुसार संस्थेत वरिष्ठ लिपीक संवर्गाचे पद रिक्त असले कारणाने बीड येथून प्रसिध्द होणाऱ्या एका दैनिकामध्ये जाहिरात प्रकाशित करुन सदर पद भरण्यासाठी अर्ज मागवले होते. संस्थेच्या कार्यालयाकडे २१ ऑक्टोबर २०२३ या दिनांकापर्यत ◀◀ पान २ वर

### बच्चू कडूंसह १२ जणांवर गुन्हा दाखल

**यवतमाळ । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्या सातबारा कोरा पदयात्रेचा समारोप प्रसंगी जिल्ह्यातील महागाव तालुक्यात अंबोडा येथे जाहीर सभा झाली. यावेळी जमलेल्या शेकडो शेतकऱ्यांनी नागपूर-तुळजापूर ◀◀ पान २ वर



## एसपीचा पुन्हा दणका: खोट्या तक्रारी करणाऱ्या तिघांवर गुन्हे दाखल

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अनेक कारणावरून खोट्या तक्रारी देण्यात येतात कारण वेगळे असते आणि तक्रार मात्र त्रास देणारी असते त्यामुळे पोलीस अधीक्षकांनी अश्यकही तक्रारी संदर्भात चौकशी करण्याचे आदेश संबंधितांना दिल्यानंतर तक्रारी खोट्या आणि यामागील करणे वेगळीच आढळून आल्याने ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१४ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १३.५० क्विंटल | २,७०१ | २,८६० | २,७८० |
| ज्वारी/हायब्रिड: २२.०० क्विंटल | १,९५० | २,७६५ | २,३१५ |
| मका/लोकल: २.५०क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : ९.५० क्विंटल | ६,००० | ६,५२७ | ६,२९४ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १८.५० क्विंटल | १,९३० | २,४२१ | २,१६६ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ४,५०१ | ५,६५१ | ५,३३२ |

# महंत शिवाजी बाबांचा निर्णय शिरसावंद्य

## हजारो भाविकांचा नारायण गडवर एकमुखी निर्धार

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायण गड येथे महंत शिवाजी महाराज जो निर्णय घेतील तो निर्णय, मग तो उत्तराधिकारी असो, विकासकामांचा असो अथवा अन्य तो निर्णय शिरसावंद्य मानू असा विश्वास श्री क्षेत्र नारायण गड येथे हजारो भाविकांनी व्यक्त केला. भाविकांच्या या निर्धारानंतर महंत शिवाजी महाराज यांनी सर्व ग्रामस्थ, नागरिक हे गडाचे भक्त आहेत, सर्व मिळून गडाचा विकास करू, समाजाला अध्यात्मिक मार्गाला लावू अशी साद घातली.**

गेल्या महिनाभरापूर्वी बीड शहराजवळील एका खाजगी वारकरी शिक्षण संस्थेत तेथील महाराज व एका विद्यार्थ्याचा पालक यांच्यात वाद झाला होता. हा आपसातील वाद असला तरी या वादात नाहक श्री क्षेत्र नारायण गड येथील उत्तराधिकारी यांचे नाव घेतले गेले होते. हा वाद आपसात मिटल्यानंतरही काही व्यक्ती मिडियाच्या माध्यमातून गडाची बदनामी करण्याचा प्रयत्न ◀◀ पान २ वर

### तरुणांचे नेमणार मंडळ

भाविकांच्या बैठकीत बोलताना महंत शिवाजी महाराज म्हणाले, की गडाच्या कामात सर्वांना सहभाग देता यावा, गडावरील कामात मदत व्हावी यासाठी प्रत्येक गावातील दोन, असे शंभर तरुणांचे कार्यकारी मंडळ नियुक्त करणार आहे. भाविक व या तरुणांच्या सहकार्यातून यापुढे गडावरील कामे होणार असल्याचेही महंत शिवाजी महाराज म्हणाले.



cmyk

## अग्रलेख

# सुरक्षा पेक्षा धास्तीच अधिक !

नक्षलवाद किंवा दहशतवाद रोखण्यासाठी महाराष्ट्रात आणि देशात अनेक प्रभावी कायदे सध्या अमलात आहेत. त्या कायद्यांचा काटेकोर वापर करून संबंधितांवर कारवाई करता येणे शक्य असताना पुन्हा नवीन कायद्याची गरज नव्हती. जनसुरक्षेच्या नावाखाली सरकारला विरोध करणाऱ्यांवर दहशत माजवणे हा सरकारचा अंतस्थ हेतू असल्याचाही आरोप केला जात आहे.

विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये वादग्रस्त जनसुरक्षा विधेयक मंजूर करून घेण्याचा सोपस्कार सरकारने पार पाडला आहे. या विधेयकाचा मसुदा जसा लोकांपुढे आला तेव्हापासूनच या विधेयकाला समाजातल्या विविध संघटनांचा आणि अनेक राजकीय पक्षांचा विरोध होता; परंतु हा विरोध सरसकट फाट्यावर मारून सरकारने हे विधेयक संमत करून घेतले आहे. या विधेयकाच्या हेतूबद्दलच लोकांच्या मनात शंका आहे. राज्यातील विविध संघटनांची सरकार विरोधातली आंदोलने, मोर्चे आणि आवाज दाबून टाकण्यासाठी हा कायदा आणला गेला आहे, असा मुख्य आक्षेप आहे. या कायद्याच्या आधारे आता कोणालाही कधीही उचलणे सरकारला सोपे जाणार आहे, त्यामुळे हे विधेयक म्हणजे जनसुरक्षेच्या नावाखाली विरोधकांवर दहशत बसवण्याचा प्रकार आहे, असा विविध संघटनांचा आरोप आहे. या आक्षेपांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देणारे निवेदन केले, पण त्यातून लोकांचे पूर्ण समाधान झालेले दिसले नाही. मुळात आता फडणवीस यांच्या विधानावर विश्वास ठेवण्याची लोकांची मानसिकता कमी झालेली आहे, ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. फडणवीस म्हणाले आहेत की, हा कायदा कोणाच्या विरोधात व्यक्तिगत स्वरूपात वापरला जाणार नाही, तर तो संघटनेच्या विरोधात वापरला जाईल. आता संघटनेच्या विरोधात हा कायदा वापरायचा म्हणजे कोणालातरी जबाबदार धरून कारवाई करणे क्रमप्राप्त आलेच. संघटना ही काही अदृश्य शक्ती नसते. कुठल्याही संघटनेचे पदाधिकारी असतात, कार्यकर्ते असतात, सदस्य असतात. मग जर एखाद्या संघटनेवर पोलिसी कारवाईचा बडगा उगारला गेला तर त्यात संघटनेचे पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्ते भरडले जाणार हे सांगायला कुठल्या राजकीय समीक्षकाची गरज नाही. त्यामुळे हा कायदा संघटनेच्या विरोधात आहे, व्यक्तींच्या विरोधात नाही हे फडणवीस यांचे म्हणणे दिशाभूल करणारे आहे. अति डाव्या किंवा नक्षली तसेच दहशतवाद पोसणाऱ्या संघटनांच्या विरोधात कारवाईसाठी हा कायदा आणण्यात आल्याचे सांगितले जाते. या संघटनांचे लोक राज्यातील शांतता बिघडवतात आणि विकासकामांमध्ये अडथळा आणतात, असा आरोपही केला गेला आहे. पण मुळात मुद्दा असा आहे की केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, देशातील ७२ टक्के नक्षलवाद आम्ही संपुष्टात आणला आहे. जर हा कायदा येण्याच्या आधीच देशाचा नक्षलवाद इतक्या मोठ्या प्रमाणात आटोक्यात आला असेल तर मुळात अशा नवीन कायद्याची गरजच काय, हा मुख्य सवाल आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले आहेत की हा जनसुरक्षा कायदा नसून भाजपसुरक्षा कायदा आहे. सरकारलाच आपल्या सुरक्षेची काळजी असल्याने त्यांनी विरोधकांवर आणि विविध सामाजिक संघटनांवर धास्ती निर्माण करण्यासाठी हा कायदा लागू केला आहे, असे त्यांचे म्हणणे होते. या कायद्याचा मसुदा जेव्हा जाहीर झाला त्यावेळी राज्यातल्या अनेक सामाजिक संघटनांच्या प्रमुखांनी तसेच विचारवंतांनी या कायद्याच्या विरोधात कठोर मतप्रदर्शन केले आहे. तेव्हापासून हा कायदा वादाच्या भोवऱ्यात सापडला होता; परंतु अशा स्वरूपाच्या आक्षेपाला जराही भीक न घालता बहुमताच्या जोरावर सरकारने हे विधेयक रेटून नेले. मुळात काही पत्रकार संघटनांनीही या कायद्याच्या विरोधात आंदोलन केले आहे. पुण्यात श्रमिक पत्रकार संघटनेनेही या विरोधात मोर्चा काढला होता. त्यामुळे या विधेयकाची धास्ती सगळ्यांच्याच मनात आहे. या कायद्याचा दुरुपयोग होणार नसल्याचा दावा सरकार कितीही करत असले तरी त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवणे कठीण आहे. आगामी काळात केव्हाही या कायद्याचा वापर करून सरकार विरोधात आवाज उठवणार्यांची मुस्कटदाबी होऊ शकते, या आरोपात तथ्य नाही असे म्हणता येत नाही. वास्तविक राज्यात फडणवीस सरकारकडे पाशवी बहुमत आहे, सरकारला राजकीय स्थिरता लाभली असतानाही असे कायदे करून आपल्याभोवतीच संशयाचे नाहक जाळे निर्माण करण्याची गरज नव्हती. आज ना उद्या आपल्या विरोधातील आवाज दाबण्यासाठी आपल्या हातात एखादा हुकमाचा पत्ता हवा या हिशेबानेच सरकारने हे पाऊल उचललेले दिसते. अर्थात, हे विधेयक विधिमंडळात मंजूर झाले असले, तरी त्याला आगामी काळात न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते. देशातले अनेक कायदे यापूर्वी वादग्रस्त ठरले आहेत. त्यामुळे ते मागे घेण्याची नामुष्की सरकारवर ओढवली आहे. टाडा कायदा आणि पोटा कायदा ही याची दोन मुख्य उदाहरणे आहेत. या कायद्याचा दुरुपयोग झाल्याचे वेळोवेळी स्पष्ट झाल्यानंतर सरकारला हे कायदे मागे घ्यावे लागले होते. महाराष्ट्रातील जनसुरक्षा कायद्याची वाटचालही त्याच दिशेने होऊ शकेल असे वातावरण आहे.

---

## आरोग्य योजनेच्या अंतर्गत गोरगरीबांना सेवा देणारे लक्ष्मण कोरडे यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

**एकत्रित आयुष्यमान भारत योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंतर्गत लक्ष्मण रोकडे यांनी गोर-गरीब लोकांना आरोग्य योजनांचा लाभ देत आहेत यामुळे त्यांचा सत्कार भाजपाचे गट कार्यकर्ता शेख मोहम्मद सलीम यांनी केला. यावेळी सोबत तेजस घोडके आदींनी सत्कार केला.**



यावेळी सत्कारास प्रत्युत्तर देतांना लक्ष्मण कोरडे म्हणाले की, कोणताही रुग्ण उपचाराअभावी वंचित राहू नये यासाठी शासनाकडून आयुष्यमान भारत योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य सारख्या महत्वपुर्ण योजना राबविल्या जात आहेत. या करिता कृष्णा हॉस्पीटल येथे येवून मला भेटावे अन्यथा ८९१९५७२६२३ या क्रमांकावर संपर्क साधावा आम्ही शासनस्तरावर पाठपुरावा करुन योग्य ती मदत करु असे आवाहन केले आहे.

## न्यायालयाकडून राहुल गांधींना जामीन

**लखनौ । वृतसंस्था**

**काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारतीय लष्करासंदर्भात केलेल्या कथित अपमानास्पद टिप्पणी प्रकरणात, लखनौच्या एमपी-एमएलए न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. भारत जोडो यात्रेदरम्यान केलेल्या एका विधानासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या या प्रकरणात, राहुल गांधी पहिल्या पाच सुनावण्यांदरम्यान न्यायालयात हजर नव्हते. मात्र, मंगळवारी अ‍ॅडिशनल चीफ ज्यूडिशियल मॅजिस्ट्रेट आलोक वर्मा यांच्या समोर स्वतः हजर होत त्यांनी सरेंडर केले आणि जामीन अर्ज दाखल केला.**

राहुल गांधी पाच सुनावण्यांना अनुपस्थित होते. यानंतर, ते आज अ‍ॅडिशनल चीफ ज्यूडिशल मजिस्ट्रेट आलोक वर्मा यांच्यासमोर स्वतः हजर झाले. खरे तर, मे महिन्यात आलाहाबाद उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळल्यानंतर, ते आज हजर झाले आहेत. राहुल गांधी यांनी संबंधित याचितेत, मानहानी प्रकरण आणि लखनौ एमपी-एमएलए न्यायालयाने फेब्रुवारी २०२५ मध्ये जारी केलेल्या समन आदेशाला आव्हान दिले होते.

## शशिकांत शिंदे पवारांच्या राष्ट्रवादीचे नवे प्रदेशाध्यक्ष

**मुंबई । प्रतिनिधी**

**शरद पवारांनी भाकरी फिरवली असून शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जयंत पाटलांच्या राजीनाम्यानंतर आता पक्षाचा धुरा शशिकांत शिंदे यांच्या खांद्यावर देण्यात आली आहे. शशिकांत शिंदे यांची निवड ही एकमताने करण्यात आली आहे. शशिकांत शिंदे हे शरद पवारांचे विश्वासू नेते मानले जातात. त्यामुळे त्यांना ही संधी मिळाल्याची चर्चा आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची मंगळवारी महत्त्वाची बैठक पार पडली. त्यामध्ये नव्या प्रदेशाध्यक्षपदाची घोषणा करण्यात आली. मावळते प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीच त्यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर शशिकांत शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली.शशिकांत शिंदे हे राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून शरद पवारांसोबत आहेत. राष्ट्रवादीच्या फुटीनंतरही त्यांनी शरद पवारांची साथ दिली. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये त्यांना मोठा अनुभव आहे. तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पक्षाच्या प्रमुख नेत्यांपैकी ते एक आहेत.शशिकांत शिंदे हे मूळचे जावळी तालुक्यातील हुमगाव येथील रहिवासी आहेत. ते वाणिज्य शाखेचे पदवीधर असून माथाडी कामगारांचे प्रभावी नेते म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म १९ऑक्टोबर १९६३ रोजी झाला. वडील जयवंतराव शिंदे आणि आई कौसल्या शिंदे यांच्या सुसंस्कृत आणि प्रेमळ वातावरणात त्यांचे बालपण गेले.१९९९ साली शशिकांत शिंदे यांनी प्रथम जावळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि १२,००० मतांच्या फरकाने विजय मिळवला. त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळाचे जलसंपदामंत्री म्हणून काम पाहिले आहे.

---


# रेशनमाफियाच्या घरातूनच पुरवठा विभागाचा पंचनामा

## होळ येथील धक्कादायक प्रकार; पुरवठा विभाग 'मॅनेज' असल्याचा ग्रामस्थांचा आरोप

**केज । प्रतिनिधी**

**तालुक्यातील होळ येथील उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या राशन दुकानातून काळा बाजारात जात असलेले ४४ क्विंटल स्वस्त धान्य धारूर पोलिसांनी पकडले. त्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर खडबडून जागे झालेल्या केजच्या पुरवठा विभागाच्या तपासणी पथकाने चक्क राशनमाफियाच्या घरात बसूनच पंचनामा केल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. या प्रकारामुळे कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.**





होळ येथील स्वस्त धान्याचा काळाबाजार धारूरमध्ये उघडकीस आला. उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या कोलंबस सहकारी संस्थेअंतर्गत त्यांचा भाऊ अशोक तुकाराम घुगे हा राशन दुकान चालवतो. त्याने राशनचे धान्य काळ्या बाजारात विक्रीसाठी पाठवल्याची कबुली वाहन चालकाने दिली. तसा धारूर पोलिसांनी पुरवठा विभागाला अहवाल दिला आहे. या पार्श्वभूमीवर राशन दुकानाची केजच्या तालुका पुरवठा विभागाकडून तपासणी करण्यात आली. या पथकात तालुका पुरवठा निरीक्षण अधिकारी सुजाता मेश्राम, श्रीमती.उंबरे, मंडळ अधिकारी संतोष देशमुख, तलाठी नामदेव उगले यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. मात्र पंचनामा करण्यासाठी संबंधित दुकानात न जाता, त्यांनी थेट राशनमाफियाच्या घरातच बसून पंचनामा सुरू केला. ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तहसीलदारांना कळवले. तहसीलदारांनी त्वरित हस्तक्षेप करत पथकातील अधिकाऱ्यांना खडसावले. त्यानंतर दुकानात बसून पंचनामा पूर्ण करण्यात आला. या संपूर्ण प्रकारामुळे होळ येथील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गोंधळ पुन्हा एकदा उघड झाला असून, जिल्हाधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

> राशन दुकानदाराच्या घरात बसून पंचनामा केला जात असल्याचा आरोप होता. त्याअनुषंगाने तहसीलदारांना कळविले आहे. योग्य ती कार्यवाही केली जाईल.
> **– शिवकुमार स्वामी, प्र. जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड**

> माझ्याकडे राशन दुकानदाराच्या घराचा व्हिडिओ आला. त्यानंतर अधिकाऱ्यांना तत्काळ दुकानातूनच पंचनामा करण्याच्या सूचना केल्या. पारदर्शक पद्धतीने चौकशी करू.
> **– राकेश गिड्डे, तहसीलदार, केज**

### माफियांच्या समोर खरे जवाब आलेच नाहीत!

पंचनाम्यासाठी राशनमाफियाच्या नातेवाईकांसह काही नागरिकांना घरासमोर बोलावून त्यांच्या जबाब नोंदवण्यात आले. एकूण २३ जणांचे जबाब घेण्यात आले असले तरी, दबावाच्या वातावरणामुळे अनेकांना खरी माहिती देता आली नाही, अशी चर्चा ग्रामस्थांत सुरू आहे. त्यामुळे तहसीलदारांनी तहसीलमध्ये जवाब घ्यावेत, मागणी ग्रामस्थांमधून केली जाणार आहे.

---

## पान १ वरून...

### गैरप्रकारांमुळे पीक विम्याची

सरकारचे नेमके उद्दिष्ट काय आहे, असा सवाल त्यांनी विचारला. तसेच, जुन्या ट्रिगर पद्धती पुन्हा जोडण्यासाठी सरकार या योजनेत दुरुस्ती करणार का? जर सरकारला विमा कंपन्यांवर अवलंबून राहावे लागत असेल, तर स्वतःची पिक विमा कंपनी का स्थापन करत नाही, असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केले. या प्रश्नांना उत्तर देताना राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी स्पष्ट केले की, जुन्या पिक विमा योजनेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होत असल्याचे आढळून आले. त्यामुळे ही योजना बंद करावी लागली. त्यांनी सांगितले की, ट्रिगर पद्धतींचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, ५० टक्के प्रयोग हे फक्त पीक कापणी प्रयोगावर आधारित होते. याशिवाय, राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती निवारण निधी (एसडीआरएफ) मधून शेतकऱ्यांना नुकसानभरपाईसाठी आपतकालीन मदत दिली जाते. मात्र, विमा योजनेतील गैरप्रकारांमुळे विमा कंपन्यांनी तब्बल १० हजार कोटी रुपयांचा नफा कमावला, तर शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळाला नाही. त्यामुळे सरकारने हा पैसा थेट शेतकऱ्यांच्या शेतात भांडवली गुंतवणुकीसाठी वापरण्याचा निर्णय घेतला आहे. कृषिमंत्री पुढे म्हणाले की, या योजनेत आता कोणतीही दुरुस्ती करणे शक्य नाही, कारण निविदा प्रक्रियाही पूर्ण झाली आहे.

-----------

### झेडपीचे वासुदेव सोळंके,

अनेक चांगली कामे तर अनेक वेळा त्यांच्यावर आरोपही झाले होते प्रामुख्याने आता त्यांची बदली छत्रपती संभाजी नगर येथील जिल्हा परिषदेमध्ये याच पदावर करण्यात आली ते अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाची जबाबदारी देण्यात आली आहे आता त्यांच्या जागी अतिरिक्त सीईओ म्हणून बीपी जाधव हे रुजू होणार आहेत त्याचबरोबर पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानोबा मोकाटे यांची बदली किनवट येथे याच पदावर झाली आहे त्यांच्या जागी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेतून किशोर काळे हे बीडला येत आहेत मोकाटे यांच्या कार्यकाळामध्ये पंचायत विभागात सुसूत्रता ग्रामपंचायती अंतर्गत विविध विकास कामे त्यांनी केली आहेत त्यामुळे त्यांचा कार्यकाल हा बीडमध्ये चांगला राहिला आहे एक चांगला अधिकारी गेल्याची देखील खंत जिल्ह्यातील ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच यांच्यामधून व्यक्त केली जात आहे.

-------------

### बाल मजुरी विरोधी कायदा

त्यावर बालमजूर काम करत असतील तर हा कायदा कुठे आहे असा प्रश्न सर्वसामान्यांना पडणार बीडमध्ये सध्या राज्य शासनाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयांची नवीन इमारत त्यासोबत तहसील कार्यालयाची मध्यवर्ती प्रशासकीय इमारत या सोबतच ऊसतोड मजुरांचे वस्तीग्रह ग्रंथालयांचे इमारत आधी शहराच्या आणि जिल्ह्याच्या विकासात वैभवांमध्ये भर टाकणाऱ्या इमारती होत आहेत ही चांगली बाब असली तरी एकीकडे आपण विकासाची मागणी करत असताना दुसरीकडे मात्र बालमजूर कायद्याची पायमल्ली होताना दिसत आहेत जिल्हाधिकारी कार्यालयाची आणि तहसील कार्यालयाचे इमारत बांधकाम ज्या ठिकाणी सुरू आहे त्या ठिकाणी बहुतांशी बालकामगाराकडून कामे करून घेतली जात असल्याचे दिसत आहेत बीड शहरातील काही सुजाण नागरिकांनी दैनिक राज्य लोकतंत्रला फोन करून तुम्ही येऊन पहा असे सांगितले त्यानंतर आमच्या प्रतिनिधींनी जाऊन पाहणी केली असता या ठिकाणी खरोखरच काही बालमजूर कार्यरत असल्याचे दिसून आले ज्या जिल्हा प्रशासनाकडून वीट भट्टी धोकादायक व्यावसायिक अशा ठिकाणी काम करत असलेल्या बालमजुरांची सुटका केली जाते यासोबतच बालकल्याण समितीने मागील महिन्यामध्ये झमझम कॉलनी मध्ये केलेल्या एका कारवाई मध्ये सोडा फॅक्टरी मध्ये काम करणाऱ्या काही परप्रांतीय बालमजुरांची सुटका केली होती ही घटना ताजी असतानाच जिल्हा प्रशासनाच्या या कामावरच बालमजूर दिसून येत आहेत त्यामुळे हा कायदा शासकीय कार्यालयात च्या बाहेरच्यांसाठी आहे की काय असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे

------------

### शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमन बहिरचे पुत्रप्रेम

एकूण ०७ अर्ज प्राप्त झालेले असल्याचे संस्थेचे मानद सचिव श्री. वनवे एस.आर. यांनी सभेमध्ये सांगीतले व सदर अर्जाचा तपशील सभेमध्ये सादर केला. सभेमध्ये सर्व प्राप्त अर्जाची छाननी करण्यात आली.यामध्ये अर्जदार बहिर निखिल श्रीराम यांची पात्रता गुणानुक्रमे सर्वोत्तम असले कारणाने सदरचे वरिष्ठ लिपिक पदासाठी बहिर निखिल श्रीराम यांची नेमणुक करण्यात यावी. त्यांना दरमहा एकत्रित पगार रु. २५०००/- देण्यात यावा असा ठराव घेण्यात आला. सदर संस्थेचे कर्मचारी सेवा नियमानुसार एकूण ४ पदे आहेत त्यामध्ये मॅनेजर / सचिव, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक आणि सेवक प्रत्येकी १ पद मंजूर आहे. यातील वरिष्ठ लिपिक या पदासाठी कोणत्याही शाखेचा पदवीधर, संगणक तसेच सहकार खात्यातील २ वर्षांचा पुर्वानुभव व सहकार खात्यातील परिक्षा (उदा. एल.डी.सी किंवा जी.डी.सी.ॲन्ड ए) पास झालेला असावा किंवा संस्थेमध्ये कमीत कमी १२ वर्षे सेवा पुर्ण केलेला असावा अशी पात्रता असताना संस्थेने वरिष्ठ लिपीक भरतीसाठी प्रकाशित जाहिरातीत सेवानियमातील तरतुदी कोणत्याही शाखेचा पदवीधर असा उल्लेख केलेला आहे. असे असतांनाही बहिर निखिल श्रीराम हे इयत्ता १२ वी पास असतांनाही त्यांना वरिष्ठ लिपीक या पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. उक्त नियुक्ती होत असतांना बहिर निखिल श्रीराम यांचे वडील संस्थेचे चेअरमन होते व आज ही आहेत. सदरची भरती ही जाणूनबुजून केलेली आहे व सदर पद भरतीस संस्थेच्या संचालक मंडळाने देखील मान्यता दिल्याची बाब समोर आली आहे.याबाबतीत उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी छत्रपती शिवाजीमहाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या. बीड संस्थेचेचे अरमन / सचिव/संचालक मंडळ यांना निर्देशाची तात्काळ अंमलबजावणी करून अहवाल या कार्यालयास सादर करावा असेही आदेशात नमूद केल्याचे समजते. आमदार संदीप क्षीरसागर यांनी तारांकित प्रश्न उपस्थित करीत सभागृहाचे लक्ष याकडे वेधले. या नंतर कार्यवाही गतिमान झाली. सदर तारांकित प्रश्न उदभवल्यानंतर सदर प्रकरणी संस्थेने दाखल केलेली कागदपत्रे व फाईल याचे अवलोकन केले असता तत्कालीन प्रभारी उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी दिलेली मंजूरी ही संस्थेच्या कर्मचारी सेवानियमाच्या विरुद असल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे सदर कर्मचारी बहिर निखिल श्रीराम यांना कमी करण्याबाबत निर्देश देण्यात आल्याचे उपनिबंधक सहकारी संस्था यांनी आदेशात म्हटले आहे.

------------

### भूमाफियांचे काळे कारनामे आ.संदीप

मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी या भूमाफियांचे कारनामे पुराव्या सकट सभागृहात मांडले असून पुढील दोन महिन्यात याबाबत कारवाई करून संबंधित भूमाफिया यांच्यासोबतच अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे आश्वासन नगर विकास राज्यमंत्री यांनी दिले आहे. बीड शहराचे नागरिकीकरण वाढल्यानंतर जालना रोड असो की नगर रोड अथवा बार्शी रोड या भागामध्ये मोठ्या प्रमाणात प्लॉटिंग निर्माण झाले आणि बंगले अपार्टमेंट रो हाऊस तयार करणारी एक भूमाफी यांची टोळी बीडमध्ये सक्रिय झाली. बीड शहरात प्लॉटिंग करताना काही मंडळींनी नगरपालिका प्रशासन नगर रचना विभाग आणि दस्त नोंदणी कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून ओपन स्पेस विक्री करत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची चर्चा होती बीड शहरात भूमाफी यांनी जो काही नंगानाच केला आहे त्यामध्ये लहान मुलांच्या खेळण्यासाठी चे आरक्षित असलेले ग्राउंड असो किंवा गार्डन मंदिर सुलभ शौचालय यासाठी लेआउट मंजूर करताना जी जागा आरक्षित ठेवली आहे तीच जागा सर्वसामान्य प्लॉट धारकांना विक्री करून भूमाफियांनी कोट्यावधी रुपये छापले असल्याचे चर्चा होती. यासंदर्भात मागील सहा सात महिन्यापासून पाठपुरावा करणारे बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि१५) रोजी सभागृहात लक्षवेधी सूचनेद्वारे शासनाचे आणि संबंधित नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले. आमदार क्षीरसागर हे या विषयावर आक्रमक झाल्याचे सभागृहात दिसून आले.

--------------

### एसपीचा पुन्हा दणकाः खोट्या

खोट्या तक्रारी करणाऱ्या तिघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले.

पोलीस स्टेशन केज येथे इसम नामे अंगद अनंत खेडकर रा. तरनळी ता. केज याने फिर्याद सांगीतली की, साखर कारखान्याची ऊस तोडणीसाठी उचल घेवुन गावाकडे जात असतांना मोटार सायकलवरुन आलेल्या तीघांनी त्यांचा पाठलाग करुन त्याला रस्त्यात आडवून त्याला शस्त्राचा धाक दाखवुन त्याच्याकडील १,७५,०००/- रुपये हिसकावून घेवुन पळून गेले अशी फिर्याद सांगत होता. परंतु पोलीसांकडून सदर प्रकरणात चौकशी केली असता त्यामध्ये सदरचा प्रकार हा बनाव असल्यचे निष्पन्न झाले. पोलीसांना खोटी माहिती देऊन पोलीसांची दिशाभूल केल्यामुळे मुळे सदर इसमाविरुद्ध पोलीस स्टेशन केज अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच दुसऱ्या घटनेत इसम नामे विठ्ठल श्रीहरी माळी रा. मोरेवाडी ता. अंबाजोगई याने डायल ११२ ला फोन करुन माहीती दिली की, त्याचे धोंडीराम आण्णा चव्हाण व बरकते रा. गांधीनगर अंबाजोगई यांनी अपहरण करुन त्याला मारहाण करुन त्याच पाय मोडला आहे. तसेच त्याला एका खोलीत डांबून ठेवले आहे. ठिकाण कोठे आहे हे मला सांगता येत नाही. असा फोन केल्याने घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी कॉल करणारे व्यक्ती तांत्रीक माहीतीच्या आधारे लोकेशन घेवुन त्याचे लोकेशन निश्चीत करुन तेथे पोलीस स्टेशन धारुर येथील सपोनि देविदास वाघमोडे, अंबाजोगई ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांना तात्काळ घटनास्थळी पाठवीले. दोन्ही पोलीस स्टेशनचे पोलीस पथक घटने ठिकाणी जावून पाहीले असता. सदर इसमाने त्याचे अपहरण झाल्याचा खोटा बनाव केला असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या विरुद्ध धारूर पोलिसात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तिसऱ्या घटनेत इसम नामे सानप शास्त्री भोसले रा. शेरी ता. आष्टी हा दिनांक ०९/०७/२०२५ रोजी त्याचे फिर्यादीवरुन अ‍ॅट्रॉसीटीचा गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी जिल्हाधीकारी कार्यालयासमोर उपोषणास बसला होता. त्याच्या उपोषणाची दखल घेवुन पोलीस स्टेशन आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांनी त्यास फिर्याद देण्यासाठी पोलीस स्टेशन येथे बोलविले. त्यावेळी इसम सानप शास्त्री भोसले यांनी पोलीस स्टेशन येथे कोणतीही तक्रार न देता पोलीस स्टेशन आष्टी येथे त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. सदर प्रकार हा पूर्णतः बनावट असून इसम सानप शास्त्री भोसले व गैरअर्जदार यांचेत पैशांचा वाद होता. सदरचा प्रकार हा पैशांच्या व्यवहारातुन घडलेला असून तो व्यवहार पूर्ण करण्यासाठी त्यांनी पोलीस व प्रशासनास वेठीस धरल्याचे निष्पन्न झाले आहे.त्यावरून त्याच्यावर देखील गुन्हा दाखल करण्यात आला अश्या खोट्या तक्रारी करण्याचा काही पायंडा पडला होता मात्र आता पोलीस अधीक्षकांनी पडताना करण्याचे आदेश दिल्यानंतर सत्य बाहेर आले . खोटी तक्रार देवुन प्रशासनास वेठीस धरणे, पोलीसांची दिशाभूल करणे, तसेच निरपराध लोकांना विनाकारण त्रास देणे असे प्रकार आता कदापी खपवून घेतले जाणार नाही,आम्ही आलेली तक्रार घेणार पण काही संशय वाटल्यास त्याची खात्री करणार असे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सांगीतले आहे.

------------

### बच्चू कडूंसह १२

राष्ट्रीय महामार्ग रोखून धरत चक्काजाम आंदोलन केले. त्यामुळे जवळपास तीन तास असंख्य वाहने रस्त्यावर अडकून पडली आणि वाहनधारकांची, प्रवाशांची गैरसोय झाली. या प्रकरणी बच्चू कडू आणि त्यांच्या १२ साथीदारांवर महागाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. महागाव पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक देवानंद शिवाजी कायंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोमवारी रात्री उशिरा हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सात-बारा कोरा पदयात्रा अमरावती, यवतमाळ, वाशिम जिल्ह्यात घेण्यात आली. सोमवारी या यात्रेचा समारोप महागाव तालुक्यातील आंबोडा गावातील श्री गजानन महाराज मंदिरात होणार होता. त्या ठिकाणी सभेची सर्व तयारी करण्यात आली होती. मात्र आंदोलकांनी ऐनवेळी या सभेचे नियोजन रद्द करून जाहीर सभा थेट नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील उडाणपुलावरच भरवली. महामार्गावर ट्रॅक्टर आडवे लावून रस्ता पूर्णपणे बंद करण्यात आला. या प्रकारामुळे नागपूर-तुळजापूर महामार्गावरील वाहतूक तब्बल तीन तास ठप्प झाली होती. पोलिसांनी या प्रकरणी, ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांच्यासह १२ जणांच्याविरूद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले.

-------------

### महंत शिवाजी बाबांचा

करत होते. हा प्रकार थांबविण्यासाठी महंत शिवाजी महाराज यांनी मंगळवारी वै. महंत महादेव महाराज यांच्या १४ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त कीर्तन केले, यानंतर भाविकांची बैठक घेतली. या बैठकीस हजारो स्त्री -पुरुष भाविकांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित भाविकांसमोर आपल्या भावना व्यक्त करताना महंत शिवाजी महाराज म्हणाले, की गेल्या काही दिवसांपासून आपल्याला काहीलोक नाहक त्रास देत आहेत, हा त्रास आता असह्य झाल्याने आपण समाजासमोर व्यक्त होत आहोत. आपण गडाचे कार्य करत असताना अनावधानाने काही चुका झाल्या असतील तर आपण भाविकांनी त्या चुका पोटात घ्याव्यात, त्या गोष्टी मला सांगाव्यात आपण त्या सुधारू, मात्र अशा गोष्टींवरुन कोणी नारायण गडची बदनामी करू नये. आपण पंढरपूर, आळंदी, पैठण, बीड व गडावर मोठमोठी कामे हाती घेतली आहेत, समाजातील सर्व भाविकांच्या पै-पै च्या देणगीतून कामे झाली आहेत व होतही आहेत. स्व. विनायकराव मेटे व मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रयत्नातून गडावर २५ कोटींचा विकासनिधी आला. ही कामे आपल्याला मिळावित, या भावनेतून काहींनी गडावरील काहीनाकाही विषय काढून बदनामी सुरू केली, याचा आपणास प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास होत असल्याची खंतही महंत शिवाजी महाराज यांनी व्यक्त केली. हे प्रकार थांबवा असे आवाहनही त्यांनी केले. महंत शिवाजी महाराज यांच्या या आवाहनानंतर येथे उपस्थित अनेक गावच्या भाविकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. महंत शिवाजी महाराज यांनी श्री क्षेत्र नारायण गड व संस्थानचा केलेला विकास, अनेक शतकांची गडाची अध्यात्मिक परंपरा असून ही परंपरा महाराष्ट्रात वृद्धिंगत केली, गडासह विविध तीर्थक्षेत्रावर भाविकांना सुविधा उपलब्ध केल्या, हे महंत शिवाजी महाराज यांनी अविरत करावे, अशी भूमिका भाविकांनी मांडली. श्री क्षेत्र नारायण गडचे उत्तराधिकारी संभाजी महाराज यांची केलेली निवड, गडासह विविध ठिकाणी सुरु असलेली विकासकामे व महंत शिवाजी महाराज घेतील ते सर्व निर्णय शिरसावंद्य मानून गडाची भक्ती करू, असा विश्वास हजारो भाविकांनी व्यक्त केला. श्री क्षेत्र नारायण गड हा कोट्यवधी भाविकांचा आहे, समाजातील काही लोकांमुळे, गडाच्या कामात अडथळा येऊ नये, अशा भावनाही अनेक भाविकांनी व्यक्त केल्या. यानंतर महंत शिवाजी महाराज यांनी सर्व भाविक हे गडाचे भक्त आहेत, सर्व आपलेच आहेत, कोणाविषयी गड कटुता ठेवणार नाही, असे मत व्यक्त करून राज्यात गडाच्या भाविकांची झालेली एकी कायम ठेवा, नगद नारायण सर्वांचे कल्याण करील, असा आशीर्वाद दिला. या बैठकीनंतर उपस्थित भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला.

------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. १६ जुलै २०२५





माजलगाव:– प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत धनंजय भीमराव टेंगसे उत्तीर्ण झाल्याने माजलगाव अर्बन येथे सत्कार करुन अभिनंदन करताना मुख्यकार्यकारी अधिकारी प्रदीप घायतीडक व कर्मचारी.

# खासगी प्रॅक्टिसमुळे स्वा.रा.ती.मधील डॉक्टरांचे शासकीय रुग्णालयाकडे दुर्लक्ष

## नॉनप्रॅक्टिसच्या नावाखाली भत्ता उचलणाऱ्या डॉक्टरांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात, रुग्णालयात सेवेतील डॉक्टरांनी पुन्हा खासगी रुग्णालयात सेवा करू नये. यासाठी त्यांना नॉनप्रॅक्टिस अलाऊन्स मिळतो. तरीही खासगी रुग्णालयात सेवा करणाऱ्या डॉक्टरांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याने शासकीय रुग्णालयातील रुग्णसेवेकडे चक्क दुर्लक्ष होतेय असा प्रश्न अनेकांकडून निर्माण केला जात आहे.

येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय वैद्यकीय प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे विविध समस्यांनी ग्रासले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व विविध विभागांचे प्रमुख यांनी खासगी रुग्णालयात पैशाच्या आमिषाने सेवा देऊ नये. म्हणून त्यांना वेतनासह नॉनप्रॅक्टिस अलाऊन्स दिला जात असताना डॉक्टर्स स्वतःच्या नातेवाइकांच्या, अथवा पत्नीच्या नावाने असलेल्या रुग्णालयात खासगीमध्ये जास्त उपचार करतात व फीस देखील मोठ्या प्रमाणावर लुबाडतात गोर गरीब रुग्णांचे यामुळे



कंबरडे मोडले जात असल्याने याचा विपरीत परिणाम शासकीय रुणालयातील रुग्णसेवेवर होत असताना दिसतो. शासकीय रुग्णालयातील बाह्य रुग्ण तपासणी संपताच मोठ्या गडबडीने ही डॉक्टर्स मंडळी स्वतःच्या,पत्नीच्या नावे असलेल्या खासगी रुग्णालयाकडे जाऊन प्रॅक्टीस करतात ही बाब आता लपून राहिलेली नाही शासनाच्या वैद्यकीय विभागाने स्टींग ऑपरेशन करून अशा डॉक्टरांवर गुन्हे दाखल करून त्यांचा पगार कपात करून घेतला पाहीजे अशी मागणी नागरिकातून होते आहे.

स्वामी रुग्णालयाच्या अधिष्ठातांनी यांनी ठोस निर्णय घेऊन अशा डॉक्टरांवर कारवाईचा बडगा दाखविला पाहीजे.

दुपारनंतर एखादा गंभीर पेशंट उपचारासाठी आला तर शिकाऊ डॉक्टरच तपासतात तर रुग्णालयात असणारे डॉक्टर्स बैठकीच्या नावाखाली आपल्या विभागात तपासण्यासाठी बोलावुनही येत नाहीत अशी भयानक स्थिती निर्माण झाली आहे.

> स्वामी रामानंद तीर्थ हे गोरगरिबांचे रुग्णालय हे रुग्णालय गोरगरीबांच असून सामान्य माणसाला चांगले उपचार मिळाले पाहिजेत. म्हणून शासन कोट्यवधी रुपये खर्च करते. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून डॉक्टरांच्या उपचार न करण्यामुळे,नर्स,वॉर्ड बॉय, गार्ड यांच्या अपमानाच्या वागणुकीमुळे रुग्ण मेटाकुटीला आले आहेत संदर्भात अधिष्ठाता करतात काय? त्यांनी ठोस निर्णय घ्यावेत.
>
> ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉ.बब्रुवाहन पोटभरे

एकदा बाह्य रूग्ण विभागातील तपासणी संपली की हे डॉक्टर्स आपल्या हाताखालील शिकावु डॉक्टरांवर तपासणी सोपवितात आणि मोकळे होतात. यामुळे त्यांचे शासकीय दवाखन्यामध्ये दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे आपल्या रुग्णांना उपचार होतील या आशेने खेड्यापाड्यातील गोर गरीब रुग्ण येतात मोफत तपासणी होते ही अपेक्षा असते मात्र ही – ती तपासणी करून घ्या असे सांगुन त्यांच्या कडून टक्केवारी मध्ये वसुली करतात असे अनेक मेडीकल दुकानदार सांगतात

शासकीय रुग्णालय येथील यंत्रणा निकामी झाल्याने, त्यांच्यावर राजकीय हात असल्याने गैरप्रकारांना ऊत आला आहे.

दवाखान्यात वशिला, गैरप्रकार वाढत आहेत. हे लहान बाळाला मृत घोषित केले या घटनेवरून लक्षात येते अशा झालेल्या घटनेची सारवा सारव केली जाते पुन्हा परिस्थिती जशी आहे तशीच राहते. सामान्य रुग्णांचे उपचार कधी होणार ही बाब महत्वाची आहे इथल्या नर्स, वॉर्ड बॉय देखील गोर गरीब रुग्णांच्या अंगावर धावून जातात त्यांना अपमानाची वागणुक देतात त्यांची तक्रार केली तर बाजू सावरण्याचा प्रयत्न होतो. यामुळे गैरप्रकार होत आहेत बरेच गैर प्रकार बाहेरच कळू दिले जात नाहीत. या बाबत आरोग्य मंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे.

## थोडक्यात...



### अंबाजोगाई येथे लिंगायत वधुवर सूचक मेळाव्याचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येत्या पाच आक्टोंबर रोजी येथील रविवार पेठेतील शंभुलिंग मठात लिंगायत समाजातील जाती – पोटजाती मधील नागरिकांसाठी वधुवर सूचक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सायंकाळी मठात लिंगायत समाजातील नागरिकांची नियोजन बैठक झाली बैठकीच्या अध्यक्षस्थानी शंभूलिंग शिवाचार्य महाराज होते. लिंगायत वधुवर सूचक मंडळाच्या कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली ती पुढील प्रमाणे : अध्यक्ष : विजयकुमार चलवदे , उपाध्यक्ष बाळासाहेब राऊत व बसलिंग अप्पा हरंगुळे , सचिव श्रीकांत ढेले, सहसचिव गणेश टुरके , कोषाध्यक्षः परमेश्वर शेटे . कार्यकारिणी सदस्य – रामलिंग रेवडकर, जगदीश ढेले, शैलेश स्वामी, सदानंद वाघमारे, ॲड संजय व्यवहारे, मनोहर बर्दापूरे , बाळासाहेब खंदारे, दिलीप बुरांडे , गणेश बुरांडे, माणिक बुरांडे, शुभम वारद वधूवर सूचक मेळाव्यात पालक आणि उमेदवारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे अवाहन संयोजकांनी केले यावेळी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली .

### कोरडा दुष्काळ जाहीर करा –कॉंग्रेसची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी



तालुक्यातील शेतकरी पावसा अभावी हातबल झाला असून बँकाचे व सावकाराचे कर्ज काढून खरिपाची पेरणी केली परंतु पूर्ण जून,अर्धा जुलै महिना संपत आला तरी पाऊस पडला नाही यामुळे या भागातला बळीराजा दुबार पेरणीच्या चिंतेने हवालदिल होऊन आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शासनाने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसगट हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे अशी मागणी माजलगाव तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष नारायण होके पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्या मार्फत निवेदनाद्वारे केली. पेरणी होऊन एक महिनां झाला तरी पाऊस पडला नाही यामुळे शेतकऱ्यांनी लागवड केलेला कापूस, सोयाबीन,मुग, उडीद हे धान उगवलेच नाही जे उगवलं ते पावसा अभावी आपल्या डोळ्यासमोर जळून जात असल्याचं पाहून बळीराजा मोठ्या आर्थिक संकटाने हताश, निराश होऊन चिंताग्रस्त झाला आहे. यासाठी शासनाने शेतकरयांना संकटातून बाहेर काढण्यासाठी या मागण्याची तात्काळ गंभीर दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा या विरोधात कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा.नारायण होके पाटील यांनी दिला



### पारधी समाजाच्या घरावर जेसीबी फिरवून संसार उध्वस्त!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात पारधी समाजातील दिव्यांग पवार कुटुंबाच्या घरावर अचानकपणे जेसीबी फिरवून घर उद्ध्वस्त करण्यात आले. या प्रकारात केवळ घरच नव्हे तर परिसरातील २५ ते ३० झाडांनाही काटेकोरपणे तोडण्यात आले, असा आरोप स्थानिकांनी केला आहे. या प्रकारामुळे पारधी समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.पाटोदा प्रशासना कडून पवार कुटुंबाला कोणतीही आधीची लिखित नोटीस देण्यात आली होती का? त्या जागेवरील असलेल्या झाडांची वृक्षतोड परवानगी घेण्यात आली होती का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप अस्पष्ट आहेत. त्यामुळे ही कारवाई बेकायदेशीर आहे का? या संदर्भात चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे. असुन समस्त पारधी समाजाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी एकमुखी मागणी केली आहे. दिव्यांग कुटुंबावर अन्याय करणाऱ्या प्रशासनाची ही वागणूक मान्य नाही, असेही समाज बांधवांनी स्पष्ट केले आहे.दरम्यान, संबंधित प्रशासनाकडून या प्रकरणावर अद्याप कोणतेही स्पष्टीकरण आलेले नाही. या प्रकारात मानवी हक्कांचे उल्लंघन झाले का? हे देखील तपासाचे एक महत्त्वाचे अंग ठरणार आहे.पारधी समाजाच्या न्यायासाठी आता सर्वत्र आवाज उठू लागला असून पवार कुटुंबीयांना न्याय मिळाला नाही तर लवकरच पाटोदा तहसील समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा पारधी समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे पदाधिकारी यांनी दिला आहे.

# प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याच्या दोषींना तात्काळ अटक करुण मुख्यमंत्री यांनी राजीनामा द्यावा –ॲड.नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे नेते प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर काल झालेल्या हल्ल्याची घटना ही खूप मोठा कट असू शकते, त्यामुळे यातील दोषी सह या कटाचा मुख्य सूत्रधार कोण आहे यांचा तपास करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावे तसेच गेल्या अनेक दिवसात महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले असून महाराष्ट्रात आराजक माजले आहे, राज्याचे गृहमंत्री, मुख्यमंत्री हे कायदा सुव्यवस्था अबाधित राखू शकले नसल्याच्या नैतिकतेतुन त्यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना दिलेल्या निवेदनाद्वारे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी केली



आहे.

महाराष्ट्र हा फुले , आंबेडकर, शाहू, कर्मवीर, क्रांतिसिंह अण्णाभाऊ यांच्या पुरोगामी विचाराचा असून याच पुरोगामी महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांमध्ये अनेक विचारवंतांना गोळ्या घालून मारण्यात आले त्यात कॉम्रेड पानसरे, दाभोळकर, यांची यांचा उल्लेख करावा लागेल तर पुरोगामी विचारांचे भाजपच्या पिल्लावळींना इतके वावडे का ? असा सवाल करत, पुरोगामी विचाराच्या कार्यकर्त्यांवर सातत्याने होत असलेले हल्ले भारतीय जनता पक्षांच्या पिलावळी या घडवून आणत आहेत, महाराष्ट्रात पुरोगामी विचारांच्या कार्यकर्त्यांवर होत असलेले हल्ले पाहता फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारधारेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन्मान करण्यासाठी आपल्या मुख्यमंत्री, गृहमंत्री पदाचे तात्काळ राजीनामे द्यावेत अन्यथा शेतकरी कामगार पक्षाचे वतीने तीव्र आंदोलन उभे करण्याचा इशारा उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासह भाई श्रीराम शेवाळे, भाई मुंजा पांचाळ आदींनी दिला आहे.

## पान ६ वरून...

### शेतकऱ्यांना मोठ्या व

कालावधीत माजलगाव तालुक्यातील ८ महसुली मंडळात १०० ते १५० मिलिमीटर पाऊस झाला आहे.या कालावधीत सरासरी ५०० मिलिमीटर पाऊस होणे अपेक्षित होते.परिणामी तालुक्यातील आठ हि महसुली मंडळात पाहिजे तसा व समाधानकारक पाऊस नसल्याने पिकांची वाढ खुंटली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.माजलगांव तालुक्यामध्ये जवळपास ९० टक्के खरिपाची पेरणी पूर्ण झालेली आहे. त्यात सोयाबीन आणि कापसाची सर्वाधिक पेरणी झालेली आहे.तर काही भागात हरीण व इतर वन्यप्राण्यांकडून पिकांचे मोठे नुकसान होत आहे. या प्राण्यांचे कळप पिकांत घुसून कोवळी पिके फस्त करीत आहेत.

### धारूरच्या मुख्य बाजारपेठेतील

संतापाची लाट पसरली आहे. रात्रीच्या अंधारात गुत्तेदाराने काम उरकण्याचा सपाटा लावला आहे. यामुळे होणारे रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे नागरिकांकडून बोलले जातात आहे.शहरातील मुख्य बाजारपेठ रस्त्यांचे काम सुरू झाले आहे...शहरातील रस्त्याच्या विकासकामांना सुरुवात झाली आहे. परंतु, या कामांचा दर्जा निकृष्ट असून, त्यात भ्रष्टाचार होत असल्याची नागरिकांमध्ये चालू आहे. धारूर शहरामध्ये व्यापारी नागरिकांच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर छत्रपती शिवाजी महाराज, चौक काशिनाथ चौक, तसेच हनुमान मंदिराकडे जाणारा मुख्य रस्त्याचे काम सध्याला सुरू आहे.पहिलाच डांबरी रस्त्याला टोकरून त्यावर माती मिश्रित कपचीचा वापर करण्यात येत आहे.. रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे.परिणामी, रस्त्याचे काम निकृष्ट होत आहे, या कामाकडे जिल्हाधिकारी यांनी वेळीच लक्ष देऊन भ्रष्टचार मोडीत आणावा अशी मागणी नागरिक करत आहेत.

### ताडसोन्ना नदीपात्रातील वाळू

खाली फेकून चार आरोपी एक ट्रॅक्टर हेडसह पसार झाले आहेत. सदर प्रकरणी बेकायदेशीर वाळू उपसा व वाहतुकीबाबत आवश्यक गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस स्टेशन पिंपळनेर यांच्या पथकाद्वारे करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनात करण्यात आली आहे.

### आगामी निवडणूकासाठी

बीडउपतालुकाप्रमुख अशोक सगळे, बीड उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, बीड तालुका संघटक महादेव मुळे, बीड तालुका संघटक गोरख कदम, सहसचिव संदिप भानप ,भरत खरात , दिपक कांबीलकर,कलिमभाई पठाण , दत्ता सुरवसे , उद्धव काकडे, भैय्या खोसे,वचिषट शेंडगे,विलास निपटे ,अंतिम पठाण,रवि म्हात्रे, शेख सादेक, शेख पठाण, आबासाहेब म्हात्रे,अशा राठोड, शितल कांबळे, सिंधुताई उजगरे, ज्ञानेश्वर सिंघन, अशोक जाधव,रामा जाधव, प्रवीण भोसले यांच्यासह बीड व माजलगाव मतदार संघातील पदाधिकारी व शिवसैनिक, महिला आघाडीच्या पदाधिकारी, युवासेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरकारी दवाखाण्यामध्ये गोरगरीबांची प्रचंड हेळसांड

आष्टी । प्रतिनिधी


मुलभूत सुविधांच्या यादीत आरोग्य सुविधेचा क्रम बराच वरचा आहे. प्रत्येकाला मोफत व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळावी, यासाठी शासकीय रुग्णालयांची निर्मिती करण्यात आली आहे. शासनाच्या अखत्यारीतील जिल्हा सामान्य रूग्णालये, ग्रामीण रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी नागरिकांना मोफत औषधोपचार मिळणे क्रमप्राप्त आहे. असे असताना आष्टी तालुक्यात ग्रामीण भागात आरोग्य सेवा रामभरोसे असल्याचे दिसत आहे. यावर कोणाचेही नियंत्रण नसल्याचे दिसून येते.

परंतु गेल्या तीन ते चार महिन्यापासून प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या अनियमिततेच्या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. भरीस भर म्हणून वंचित आणि दुर्बल घटकातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्यात बाधा येत आहे. आष्टी तालुक्यातील धामणगांव प्राथमिक आरोग्य केंद्रात असाच काहीसा असुविधेचा पाढा नागरिकांमधून वाचला गेला आहे. रुग्णालयामधील बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) येथे दररोज कित्येक रूग्ण औषधोपचारासाठी येतात. पण ओपेडी नंतर येथील डॉक्टर व कर्मचारी कुठे जातात याची प्रचिती सोमवार दि. १४ जुलै रोजी आली. दवाखाण्याचे शटर ओढल्याने दवाखाणा चालु आहे की बंद रूग्णांना हे समजेना. डॉक्टर कोठे गेले असे शिपायास विचारले असता ते म्हणाले जेवण करायला गेले आहेत. त्यावर डॉक्टरांना फोन केला असता ते म्हणाले मी ऑनलाईनच्या कामे करत आहे. यावर तालुका अरोग्य अधिकारी यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, मी तिथे असतो का? तुम्ही मला काहीपण कसे विचारता? त्यांनी साधी डॉक्टरांना फोन करण्याची तसदी सुद्धा घेतली नाही. या दवाखाण्याची रूग्णवाहिका किरकोळ कारणाने बंद अवस्थेत आहे. यामुळे येथील रूग्णांना खाजगी गाडी बोलावून आर्थिक झळ सहण करावी लागत आहे. सध्या आहे. सध्या डेंग्यू, मलेरीया, टायफाईड आणि व्हायरल इन्फेक्शन च्या साथीने डोके वर काढले आहे. साथरोग वातावरणामुळे चालु आहेत. असे असताना धामणगाव परिसरातील रूग्ण म्हणतात की आपला खाजगी दवाखानाच बरा. यामुळे तालुक्यातील रूग्णसेवा करण्यासाठी शासनाने नियुक्ती केलेले शासकीय पगारी कर्मचारी काम काय करत आहेत ? हा मोठा यक्ष प्रश्न सध्या जनते पुढे आहे. शासनाची सेवा सामान्यांसाठी नाही नागरिकांत बोलले जात आहे. आमदार साहेब जरा तालुक्यातील या आरोग्य केंद्राकडे लक्ष घाला आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयात देखील असाच प्रकार होता किरकोळ जखमी असलेल्या रुग्णांना अहिल्यानगर येथे रेफर केले जात आहे रुग्णालयामध्ये मोठ्या प्रमाणावर डॉक्टर्सची कागदपत्रे यादी आहे मात्र प्रत्यक्षात या ठिकाणी काही ठराविक डॉक्टर सेवा करतात देखील दुर्दैवी बाब आहे.

## श्रीधर यादव यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील प्रतिष्ठीत नागरिक श्रीधर दगडोबा



यादव यांचे दि.१३ जुलै रविवार रोजी सायं ६:०० वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले आहे.मृत्यू समयी त्यांचे वय ९५ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर दि.१४ जुलै सोमवार रोजी सकाळी ९:०० वाजता मोठेवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात तीन मुली,दोन नातु,नातं सुना असा परिवार आहे. मोठेवाडी येथील प्रगतिशील शेतकरी महादेव पंडीतराव यादव व शिक्षक विष्णु पंडीतराव यादव यांचे ते आजोबा होते.

# म.रा.कृ.अधिकारी, कर्मचारी संघटनेत सहभागी व्हा– चंद्रकांत दळवी

बीड । प्रतिनिधी

सरकारी सेवेतून निवृत्त झालेल्या कृतिशील व्यक्तींना एकत्र आणून त्यांच्या दीर्घ सेवेतील अनुभवाचा लाभ सामान्य नागरिकांना मिळावा ,सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांची प्रकृती व स्वास्थ्यासाठी ते सतत कार्यरत राहावे व त्यांच्या सुरक्षितेची काळजी घेतली जाईल त्यासाठी संस्थेचे हात बळकट व मजबूत करण्यासाठी निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त कर्मचारी संघटनेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी(भाप्रसे) विभागीय आयुक्त पुणे यांनी केले आहे

रविवारी पुणे येथील पत्रकार भवन नवी पेठ येथे आयोजित केलेल्या संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते, यावेळी व्यासपीठावर



सेवानिवृत्त जलसंपदा विभागाचे सचिव व्यंकटराव गायकवाड ,प्रकाश भामरे, नाशिक लेखा व कोषागार चे संचालक रवींद्र धोंगडे, इंजि.मनोहर पोकळे, तुकाराम गुरव, अरुण कांबळे ,सुनील कुराडे ,बाळासाहेब गोरे ,विनोद देसाई, ज बीड येथून सेवानिवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक कोल्हे, जी.एन.भोरे, से.नि. विस्ताराधिकारी गौतम चोपडे, तुकाराम पवार ,बाळासाहेब खेडकर, प्रल्हाद जावळे आदी उपस्थित होते .

पुढे बोलताना चंद्रकांत दळवी यांनी महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून सर्व अधिकारी कर्मचारी यांच्या सेवा निवृत्ती विषयक प्रकरणी निकाली काढून तसेच केंद्र सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठी २०१६ मध्ये सुधारित मार्गदर्शक धोरण प्रसिद्ध केले असून महाराष्ट्र शासनाने दिनांक ९ जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये ज्येष्ठ नागरिकांचे धोरण प्रसिद्ध केले असून त्याप्रमाणे अंमलबजावणी अपेक्षित असलेले सांगून राज्यात विभाग व जिल्हा निहाय कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने संघटनेत सामील होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले .

यावेळी कार्यक्रमाची प्रास्ताविक मनोहर पोकळे यांनी केले. सेवानिवृत्त प्राचार्य चंद्रकांत नलावडे (सातारा) मनोहर पवार( ठाणे) प्रकाश भामरे, रवींद्र धोंगडे ,तुकाराम गुरव, व्यंकटराव गायकवाड, सुमन शिंदे ,सुनील कुराडे, अरुण कांबळे ,जी .एन .भोरे आदींची यावेळी मार्गदर्शन करून भाषणे झाली. ,यावेळी विशेष स्मरणिका २०२५ चे विमोचन करण्यात आले .तर या सभेत २० ठराव सर्वानुमते सम्मत करण्यात आले. या सभेला बीड ,संभाजीनगर, जालना ,अहिल्यानगर,पुणे, उस्मानाबाद ,मालेगाव, सोलापूर, परभणी, नांदेड, लातूर ,कोल्हापूर, नाशिक,नंदुरबार, गडचिरोली, मुंबई सह ३३ जिल्ह्यातील संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुनंदा जरांडे तर आभार प्रदर्शन रवींद्र धोंगडे आणि मानले.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६
E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–२४ दिनांक–१०/०६/२०२५

**जाहीर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती ज्योती विष्णू मगरे रा.दह्याळ ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म / मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| | ज्योती विष्णू मगरे | स्वत: | ०५/०२/२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– १६/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**जाहीर प्रगटन**

मा. श्री. अ.सं. जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नं.२०९/२०२५

मार्फत आर. के. बडे सतिश वि. निल

अर्जदार : १. सतिश पि.अच्युतराव केदार, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. वारणी, ता. शिरूर कासार, जि. बीड

**अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत.**

ज्यापोक्षा मयत नामे सिंधुबाई भ्र. अच्युतराव केदार यांचा मृत्यू दि. ०४.०९.२०२० रोजी मौजे वारणी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार है उपरोक्त मयत याचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २८.०८.२०२५ ही आहे.

**स्वाक्षरीत**
**क. लिपीक**

**आदेशावरुन,**
**स्वाक्षरीत**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर. शिरूर का.**

cmyk

cmyk

राज्य लोकतंत्र **शेत-शिवार**

बुधवार दि. १६ जुलै २०२५ | ४

# बनावट बियाण्यांमुळे उत्पादन शक्ती कमी; शेतकऱ्यांचे नुकसान

## राज्यात काही ठिकाणी दुबार पेरणीचे संकेत

पुणे : खरीप हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरलेली बियाणे बनावट निघाल्याने राज्यातीले अनेकांना दुबार पेरणीचा फटका बसला आहे. उगमशक्ती कमी असल्यामुळे आर्थिक नुकसान होत असून कृषी विभागाने दोषी सेवा केंद्रांवर छापे टाकून कारवाईला सुरुवात केली आहे.

बियाण्यांसाठी शेतकऱ्यांनी कर्ज काढले, पण उत्पादन मिळत नसून, आर्थिक फटका बसत आहे. जिल्ह्यात यावर्षी कृषी विभागाकडे दाखल तक्रारींची दखल घेत काही सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आली आहे. कृषी विभागाकडे यंदा बनावट बियाण्यांविषयी अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. काही कृषी सेवा केंद्रांवर छापे टाकून बोगस बियाण्यांची साठवणूक व विक्री उघडकीस आली असून, संबंधित विक्रेत्यांविरोधात कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. यंदा काही बियाण्यांची उगमशक्ती केवळ ३० टक्क्यांपर्यंत असल्याचे समोर आले आहे. परिणामी, अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागत आहे. त्यावर अतिरिक्त खर्च येत असून, पावसाच्या अनियमिततेमुळे दुबार पेरणीसाठीचा वेळही कमी झाला आहे. त्यामुळे हंगामात अपेक्षित उत्पादन न मिळण्याची शक्यता आहे.


कशी कराल तक्रार :शेतकऱ्यांनी वापरलेल्या बियाण्याच्या पिशवीवरील तपशीलासह जवळच्या कृषी सहायक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तक्रार द्यावी. प्रयोगशाळा अहवालात दोष सिद्ध झाल्यास नुकसानभरपाई मिळवता येते. मात्र, यासाठी बियाण्याची पिशवी, बिल व अन्य रेकॉर्ड सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

कायद्यांतर्गत कारवाईची तरतूद : बीज नियंत्रण अधिनियम १९६६ नुसार बोगस बियाण्यांची विक्री करणाऱ्याला तीन वर्षांपर्यंत कारावास आणि दंडाची तरतूद आहे.

जिल्ह्यातही दोषी विक्रेत्यांविरोधात एफआयआर दाखल करण्याची आणि परवाने निलंबित/रद्द करण्याची प्रक्रिया सुरू आहे. बियाणे खरेदी करताना अधिकृत सेवा केंद्रावरच खरेदी करावी. पिशवीवरील तपशील तपासावा आणि पुरावे सुरक्षित ठेवावेत. कुठल्याही शंका असल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा.



# खतांशिवाय मिळवा अधिक उत्पन्न : कसे ते घ्या जाणून



खत व औषधांवरील खर्च कमी करायचा असेल, तर शेतकऱ्यांनी काही खास सेंद्रिय संवर्धकांचा वापर करणे अत्यंत उपयुक्त ठरते. सध्या सेंद्रिय शेती पद्धती अधिक लोकप्रिय होत असली, तरी त्यासाठी लागणाऱ्या निविष्ठांचा दर्जा, गुणवत्ता आणि उपलब्धता या बाबतीत अडचणी येत आहेत. मात्र योग्य प्रकारच्या जैविक व सेंद्रिय संवर्धकांचा वापर केल्यास शेतीतील उत्पादन खर्च कमी करता येतो आणि पिकांची रोगप्रतिकारक शक्तीही वाढते.सेंद्रिय शेतीमध्ये मुख्यतः बियाण्यांची प्रक्रिया व नंतर त्याद्वारे पोषक तत्त्वांची उपलब्धता वाढवणे, तसेच कीड व रोग नियंत्रण करणे शक्य होते. खाली दिलेली आठ संवर्धके वापरल्यास तुमचा खत व औषधांवरील खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल.

रायझोबियम कल्चर :२५ ग्रॅम/२५ मिली प्रति किलो बियाणे. डाळवर्गीय पिकांसाठी वापरले जाते. हे संवर्धक नत्राची उपलब्धता वाढवते व पिकांची वाढ सुधारते.

अॅझोटोबॅक्टर कल्चर :२५ ग्रॅम/२५ मिली प्रति किलो बियाणे. हे तृणधान्यवर्गीय व इतर पिकांमध्ये वापरले जाते. मुळांजवळ नत्राचे प्रमाण वाढवून उत्पादन क्षमता वाढवते.

अॅझोस्पिरीलम :२५ ग्रॅम/२५ मिली प्रति किलो बियाणे. अॅझोटोबॅक्टरप्रमाणेच हे देखील नत्र उपलब्धतेस मदत करते व पिकांना ऊर्जा देण्याचे काम करते.

अॅसिटोबॅक्टर :५०० ग्रॅम/५० लिटर पाणी. ऊस पिकामध्ये वापरले जाते. नत्राच्या उपलब्धतेस मदत करून ऊसाच्या बेण्याची चांगली वाढ होते.

फॉस्फोबॅक्टेरिया (रायझोबियम दुसरी भूमिका) :२५ ग्रॅम/२५ मिली प्रति किलो बियाणे. सर्व प्रकारच्या पिकांमध्ये स्फुरदाची (फॉस्फरस) उपलब्धता वाढवते, जे मुळांची वाढ व फुलधारणा यासाठी उपयुक्त आहे.

सुडोमोनास :१० ग्रॅम/१० मिली प्रति किलो बियाणे. हे बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करते. पिकांची सुरुवातीची अवस्था सुरक्षित ठेवते.

ट्रायकोडर्मा :५-१० ग्रॅम किंवा ५-१० मिली प्रति किलो बियाणे. यामुळे बुरशीजन्य रोगांपासून बचाव होतो. पिकांच्या आरोग्यासाठी हे खूप महत्त्वाचे आहे.जिवाणुसंघ (मायक्रोबियल कॉकटेल) : १० मिली प्रति किलो बियाणे. नत्र, स्फुरद आणि पालाश यासारख्या मुख्य अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढवते.

# दुधाळ जनावरे खरेदी करताना या गोष्टी लक्षात ठेवा

पशुपालन हा एक कृषी व्यवसाय आहे जो भूमिहीन शेतकरी देखील करू शकतो. पशुपालन केल्याने शेतकऱ्यांना दूध तसेच शेणखत मिळते. पशुपालन सुरू करण्यापूर्वी शेतकऱ्यांना जनावरे खरेदी करताना अनेक गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी पशुपालन हा उत्तम पर्याय आहे. शेतकरी शेतीसोबतच पशुपालन करून चांगले उत्पन्न मिळवतात. पशुपालन हा एक कृषी व्यवसाय आहे जो भूमिहीन शेतकरी देखील करू शकतो. पशुपालन केल्याने शेतकऱ्यांना दूध तसेच शेणखत मिळते. पशुपालन सुरू करण्यापूर्वी शेतकऱ्यांना जनावरे खरेदी करताना अनेक गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. निरोगी जनावर जास्त दूध देते आणि शेतकऱ्याला चांगला नफा मिळतो. यासाठी दुभती जनावरे खरेदी करण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

दुभत्या जनावरांची ओळख : दुधाळ जनावर खरेदी करण्यापूर्वी त्याचे मूल्यमापन करणे महत्त्वाचे आहे. त्यांची दूध उत्पादन क्षमता, दरवर्षी बाळंतपणाची क्षमता, निरोगी आणि उपयुक्त जीवन या आधारे मूल्यांकन केले जाते. या आधारावर चांगल्या दुभत्या जनावरांची निवड करता येते.

शरीराचा आकार : दुभत्या जनावराचे शरीर त्रिकोणी आकाराचे असावे, म्हणजे समोरून पातळ आणि मागून रुंद असावे. त्वचा पातळ आणि गुळगुळीत असावी आणि शेपटी लांब असावी. डोळे फुगवे आणि तेजस्वी असावेत. खांदा शरीराशी चांगला जोडलेला असावा. दुभत्या गाईच्या मांड्या पातळ आणि सपाट असाव्यात आणि मान पातळ, लांब आणि वेगळी असावी. जनावरांचे पोट चांगले विकसित झालेले असावे. कासेचा आकारही चांगला असावा. त्याची त्वचा मऊ, लवचिक आणि चमकदार असावी. कासेचे चारही भाग एकमेकांपासून समान अंतरावर समान लांब आणि जाड असावेत. कासेतील दुधाच्या शिरा फुगलेल्या, वाकड्या आणि चांगल्या विकसित असाव्यात.

दूध उत्पादन क्षमता : दुभत्या जनावराची खरेदी करण्यापूर्वी त्याचे दोन-तीन दिवस दूध पाजावे व त्याची पूर्ण तपासणी करावी. दूध काढताना दुधाच्या धारा सरळ पडल्या पाहिजेत आणि दूध काढल्यानंतर कासेची आकुंचन झाली पाहिजे.

प्राण्यांचा वंश : जनावरांच्या वंशाविषयी सविस्तर माहिती उपलब्ध असल्यास गायीच्या जातीबद्दल आणि तिची दूध उत्पादन क्षमता याबाबत योग्य माहिती मिळू शकते. डेअरी फार्ममधून जनावरे खरेदी करताना या सुविधेचा लाभ घेता येईल.

प्राण्यांचे वय : १० ते १२ वर्षांच्या वयानंतर प्राण्यांची प्रजनन क्षमता संपते. गर्भधारणेच्या तिसऱ्या किंवा चौथ्या अवस्थेपर्यंत दुधाचे उत्पादन शिखरावर असते, जे हळूहळू कमी होते. त्यामुळे गरोदरपणाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या टप्प्यात जनावरे खरेदी करणे दुग्ध व्यवसायासाठी अधिक फायदेशीर आहे.

आरोग्याची काळजी : जनावरांचे आरोग्य चांगले असावे. लसीकरण आणि आतापर्यंत झालेल्या आजारांबाबत योग्य माहिती मिळावी.

प्रजननक्षमता : खरी दुभती गाय ती आहे जी दरवर्षी एका वासराला जन्म देते. जनावर खरेदी करताना दुभत्या जनावराचा प्रजनन इतिहास नीट जाणून घ्यावा. जर त्यात कोणत्याही प्रकारची कमतरता असेल तर ती विकत घेऊ नये, कारण ही कमतरता कधी रोगामुळे असते तर कधी ती अनुवांशिक असते. त्यामुळे भविष्यात वेळेवर गर्भधारणा न होणे, गर्भपात, निरोगी मुलाला जन्म न देणे, प्रसूतीमध्ये अडचण अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

दात पाहून वय शोधा : प्राण्यांचे नेमके वय त्यांच्या दातांवरून कळू शकते. पहिल्या कायमस्वरूपी दात दोन वर्षांच्या वयात दिसतात. दुसरी जोडी चौथ्या वर्षाच्या शेवटी दिसते, जी प्राण्याचे वय ओळखण्यास मदत करते.

हॉर्न रिंग्सवरून वय शोधा : प्राण्याच्या शिंगावर पहिली अंगठी वयाच्या ३ व्या वर्षी तयार होते. यानंतर दरवर्षी एक वलय तयार होते. शिंगावर तयार होणाऱ्या वलयांच्या संख्येत दोन जोडून प्राण्याचे वय ठरवता येते.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

६२२ : प्रेषित मुहम्मद पैगंबर यांनी मदिनेहून प्रयाण केले. चंद्रावर आधारित असलेल्या इस्लामिक (हिजरी) कॅलेंडरची या दिवसापासुन सुरूवात झाली.

१९४५ : अमेरिकेने तयार केलेल्या अणूबॉम्बची न्यू मेक्सिकोमधील लास अलमॉस येथील वाळवंटात चाचणी

१९५१ : ब्रिटन देशाने नेपाल देशाला स्वतंत्र घोषित केलं.

१९६५ : ईटली व फ्रान्सला जोडणार्या मॉंट ब्लॅंक बोगद्याचे उद्घाटन झाले.

१९६९ : चंद्रावर पहिला मानव उतरवणार्या 'अपोलो-११' अंतराळयानाचे फ्लोरिडा येथुन प्रक्षेपण

१९८१ : भारताने अणुबॉम्ब ची चाचणी केली.

१९९२ : भारताचे नववे राष्ट्रपती म्हणून डॉ. शंकरदयाळ शर्मा यांची निवड झाली. तत्पुर्वी ते उपराष्ट्रपती आणि महाराष्ट्राचे राज्यपाल होते.

१९९८ : गुजराथमधे शाळेतील प्रवेशाच्या वेळी पाल्याच्या नावानंतर आईलाही नाव लावण्याचा अधिकार आहे; असा निर्णय घेतल्याची माहिती गुजराथच्या शिक्षण राज्यमंत्री श्रीमती आनंदीबेन पटेल यांनी विधानसभेत दिली.

२००६ : संयुक्त राष्ट्र परिषदेने कोरिया राष्ट्रावर बंदी घालण्याच्या ठरावास मंजूरी दिली.

२००७ : बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीना वाजीद यांना भ्रष्टाचार प्रकरणी कैद करण्यात आलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : सुप्रसिद्ध युरोपियन चित्रकार व रॉयल अकॅडमीच पहिले अध्यक्ष व्यंगचित्रकार सर जोशुवा रेनाल्ड्स यांचा जन्मदिन.

१७७३ : सर जोशुआ रेनॉल्ड्स ब्रिटिश चित्रकार व रॉयल ॲकॅडमीचे पहिले अध्यक्ष, व्यक्तिचित्रे काढण्याबद्दल त्यांची प्रसिद्धी होती. (मृत्यू: २३ फेब्रुवारी १७९२ लंडन, इंग्लंड)

१८९६ : नॉर्वे देशांतील प्रसिद्ध राजकीय राजकारणी, कामगार नेते सरकारी अधिकरी व लेखक तसचं, संयुक्त राष्ट्र संघाचे पहिले सरचिटणीस ट्रिग्वे हलवदान ली यांचा जन्मदिन.

१९०९ : अरुणा असफ अली स्वातंत्र्यसेनानी. ९ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर तिरंगा फडकवला होता. लेनिन शांतता पुरस्कार, इंदिरा गांधी शांतता पुरस्कार, पद्मविभूषण, आंतरराष्ट्रीय सद्भावना पुरस्कार, भारतरत्न (मरणोत्तर) इ. पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (मृत्यू: २९ जुलै १९९६)

१९२३ : के. व्ही. कृष्णराव भूदल प्रमुख, जम्मू काश्मीर, नागालँड, मणिपूर व त्रिपूराचे राज्यपाल

१९१३ : स्वामी शांतानंद सरस्वती ज्योतिर्मठाचे शंकराचार्य (मृत्यू: ७ डिसेंबर १९९७ अलाहाबाद, उत्तर प्रदेश)

१९१४: वामनराव कृष्णाजी तथा वा. कृ. चोरघडे साहित्यिक (लघुकथा, लोककथा, बालवाङ्मय, चरित्र, अनुवाद), विचारवंत व स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: ३० नोव्हेंबर १९९५)

१९१७ : जगदीश चंद्र माथूर नाटककार व लेखक (मृत्यू: १४ मे १९७८)

१९४३ : प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे लेखक व इंग्रजीचे प्राध्यापक (मृत्यू: ६ जानेवारी २०१०)

१९६८ : धनराज पिल्ले हॉकी पटू

१९७३ : शॉन पोलॉक दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेटपटू

१९८३ : ब्रिटीश वंशीय भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कतरिना कैफ यांचा जन्मदिन.

१९८४ : कतरिना कैफ चित्रपट कलाकार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३४२ : चार्ल्स (पहिला) हंगेरीचा राजा (जन्म:१२८८)

१८८२ : अमेरिकेचे माजी राष्ट्रपती अब्राहम लिंकन यांच्या पत्नी मेरी टॉड लिंकन यांचे निधन.

१९८६ : वासुदेव सीताराम तथा वा. सी. बेन्द्रे इतिहासकार (जन्म: १३ फेब्रुवारी १८९४)

१९९३ : उस्ताद निसार हुसेन खाँ पद्मभूषण (१९७०), रामपूर साहसवान घराण्याचे तराणा व ख्यालगायक, संगीत संशोधन अकादमीचे निवासी शिक्षक, आकाशवाणी कलाकार, उस्ताद राशिद खाँ यांचे गुरू (जन्म:१९०९)

१९९४ : नोबल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ ज्युलियन श्विन्गर यांचे निधन.

२००५ : रॅमन मॅग्सेसे पुरस्कार विजेता प्रसिद्ध भारतीय कन्नड भाषिक नाटककार आणि निनासम धर्म संस्था संस्थेचे संस्थापक के. वी. सुबन्ना यांचे निधन.

२००९ : पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार तसचं, संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय कर्नाटिक संगीतकार व तमिळ चित्रपट पार्श्वगायिका दमल कृष्णस्वामी पट्टममल यांचे निधन.

२०१३ : प्रसिद्ध भारतीय इतिहासकार व प्राध्यापक तसचं, सोशल सेंटर फॉर स्टडीज इन सोशलचे संस्थापक-संचालक बरुण डी यांचे निधन.

# वाढती मागणी, निर्यातीसाठी शेतीला जोड द्या वराहपालनाची

शेतीला जोडधंदा म्हणून अनेक व्यवसाय केले जातात. त्यापैकीच एक म्हणजे वराहपालन. बाजारपेठेतील वाढती मागणी, निर्यातीतील संधी आणि वराहाच्या मांसाची पौष्टिकता लक्षात घेतली तर अनेक लोक या व्यवसायाकडे वळत आहेत.

वराहपालन हे प्रामुख्याने मांस म्हणजेच पोर्क उत्पादनासाठी केले जाते. मोठे रेस्टॉरंट, हॉटेलमध्ये पोर्क आणि बेकन खाद्यपदार्थांना चांगली मागणी असते. वराहाच मांस सौंदर्य प्रसाधन तयार करण्यासाठी आणि संशोधनासाठीही वापरल जात. याशिवाय पोर्कची निर्यातही मोठ्या प्रमाणात होते. आपल्याकडे गोवा, पंजाब आणि पूर्वेकडील राज्यात वराहाच्या मांसाला जास्त मागणी आहे. वराहाचे शरीरविज्ञान मानवी शरीर क्रियेप्रमाणेच काम करते. त्यामुळे अल्कोहोल आणि इतर औषधांचा मानवामध्ये वापर करण्यापूर्वी वराहावर होणाऱ्या वाईट परिणामांचा अभ्यास केला जातो. वराहाचे मूत्रपिंड, हृदय आणि यकृत मानवामध्ये प्रत्यारोपित केले जाऊ शकते. मानवाच्या खराब झालेल्या त्वचेवर वराहाची त्वचा प्रत्यारोपित केली जाते. त्यामुळे वराहाच्या कातडीलासुद्धा चांगली मागणी आहे.मांसाच जास्त उत्पादन घेण्यासाठी मादी वराहांनी गाभण राहून जास्तीत जास्त पिल्लांना जन्म दिला पाहिजे. विशेष म्हणजे मादी वराहाचा गाभण काळ हा फक्त ११४ दिवसांचा असतो. म्हणजे वराह १५ महिन्यातून ३ वेळा पिल्लांना जन्म देऊ शकतात. एका वेळी जन्माला येणाऱ्या पिल्लांची संख्या ६ ते १२ इतकी असू शकते. योग्य काळजी घेतली तर या पिलांच वजनही झपाट्यान वाढत. वराह हे अखाद्य तसेच हॉटेल मधील टाकाऊ खाद्य पदार्थावर जगू शकतात.वराहाची विष्ठा शेतात खत म्हणून वापरता येते. वराहपालन जर सुरु करायचे असेल तर फार्मचा आकार आणि वराह संगोपनाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. यामध्ये वराहाच्या सुधारित संकरित जातींची निवड आणि संतुलित आहाराच्या नियोजनाला महत्व आहे.

वराह फार्म कसे तयार करावे :फायदेशीर व्यवसायासाठी वराह फार्म यार्ड, औषधोपचार, जंतनिर्मूलन आणि वराहांचे लसीकरण या बाबींकडे विशेष लक्ष देण्याची गरज असते.वराहपालनासाठी शेड बनवताना जमीन खडबडीत असावी. शेडचे आकारमान ३ मीटर बाय २.४ मीटर किंवा ३ मीटर बाय ३ मीटर असे सम आकाराचे किंवा थोडे मोठे असावे. शेडच्या आजूबाजूला झाडे लावावीत.वराहांना घाम येणाऱ्या ग्रंथी कमी असतात. त्यामुळे उन्हाळ्यात आणि प्रजनन काळात वराहांना फिरण्यासाठी चिखलाची गरज असते. त्यासाठी शेडजवळ कृत्रिम चिखलाचा डोह तयार करावा. त्याला योग्य नाली ठेवावी. चिखलाच्या खड्ड्याचा साधारण आकार आणि संख्या वराहांच्या आकाराप्रमाणे ठेवावी.



cmyk

# लोकजागृती आणि लोकशिक्षणातून समाजाला दिशा देण्याचा प्रयत्न करू -ॲड. अजित देशमुख




रांजणगाव। प्रतिनिधी

सध्या समाजाला चांगल्या कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या मुद्द्यांवर लोकशिक्षण आणि लोक जागृती करणे आवश्यक आहे. संघटन असल्याशिवाय जनतेचे लहान लहान प्रश्न सुटत नाहीत. आणि त्यांना मार्गदर्शन होत नाही. त्यामुळे स्वराज्य जनजागृती परिषदेची स्थापना केली असून या माध्यमातून आपण जनतेचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू, असे प्रतिपादन स्वराज्य जन जागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी केली आहे. स्वराज्य जनजागृती परिषदेची आज रांजणगाव येथे विश्वस्त मंडळाची पहिली सभा पार पडली. या सभेमध्ये ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, शेतकरी विद्यार्थी आणि कष्टकऱ्यांचे अनेक प्रश्न सध्या भेडसावत आहेत. या सर्व प्रश्नांवर एकत्रित येऊन चर्चा करण्याची गरज निर्माण झाली आहे. कार्यकर्त्यांमध्ये काम करण्याची क्षमता आहे. त्यामुळे असे सर्व कार्यकर्ते परिषदेच्या माध्यमातून एकत्र करून समाजाला दिशा देण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत. नवी पिढी आदर्श घेईल असे काम परिषदेच्या माध्यमातून झाली पाहिजे, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये लवकरात लवकर पोहोचण्यासाठी यावेळी चर्चा करण्यात आली. वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकांपर्यंत कसे पोहोचता येईल, यावर काही निर्णय घेण्यात आले. परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप, सातारा यांनी आपले विचार मांडताना म्हंटले की, परिषदेत काम करण्यासाठी चारित्र्यसंपन्न लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जास्तीत जास्त तरुणांचा समावेश करून घेण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रित करावे. त्याचप्रमाणे संघटन मोठे होण्यासाठी योग्य निर्णय घ्यावे लागतील. परिषदेचे कोषाध्यक्ष शिवाजी खेडकर, पुणे यांनी परिषद केवळ महाराष्ट्रात नाही तर महाराष्ट्राच्या बाहेर देखील मोठ्या प्रमाणात काम उभे करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. शेतकरी आणि कामगारांच्या मुद्द्या बरोबरच लोकजागृतीच्या मुद्द्यावर देखील त्यांनी आपले मत स्पष्ट केले. शिक्षण व्यवस्थेमध्ये गाव पातळी करून पासून सुधारणा व्हावी, म्हणून शाळांकडे लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा गावातच मिळून देण्यासाठी सक्रिय राहावे लागेल, असे प्रतिपादन परिषदेचे सचिव तुषार पाटील यांनी केले. तर सर्वच काम करत असताना कार्यकर्त्यांनी दक्ष राहून शक्य तेवढा वेळ देऊन काम करण्याची गरज असल्याचे परिषदेचे विश्वस्त गोवर्धन मस्के आणि विष्णू ढवळे यांनी म्हटले. मा. अण्णा हजारे यांनी परिषदेला दिलेला शुभेच्छा संदेश गोवर्धन मस्के यांनी वाचून दाखवला. आजच्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांनी बैठकीतील सर्व मुद्द्यांवर सक्रिय सहभाग नोंदवत चर्चेत भाग घेतला. वेगवेगळ्या दृष्टिकोनातून संघटन वाढीसाठी काय करता येईल, यावर विचार मंथन देखील करण्यात आले. श्रीक्षेत्र रांजणगाव (गणपतीचे)येथील ग्रामपंचायत सभागृहात पार पडलेल्या या बैठकीचे सूत्रसंचालन गोवर्धन मस्के यांनी केले. तर आभार प्रदर्शन शिवाजी खेडकर यांनी केले.

## मातोश्री शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याची मुदत

बीड। प्रतिनिधी

मातोश्री शासकीय ईबीसी मुलांचे वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांनी १५ ते ३१ जुलै, २०२५ या कालावधीमध्ये अर्ज सादर करावेत, असे आवाहन वसतिगृहाच्यावतीने करण्यात आले आहे.

माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालय, आयटीआय, तंत्रनिकेतन आदी ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश दिला जातो. मागील वर्षात वसतीगृहात प्रवेश असलेल्या विद्यार्थ्यांना पुनर्प्रवेशासाठी ६० टक्के गुण आवश्यक आहेत. प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ३१ जुलै, २०२५ पर्यंत विहित नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्ट्या वगळता) सादर करावेत. त्रुटी असलेले, अपूर्ण अर्ज व अंतिम तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असेही वसतिगृहाच्या गृहप्रमुखांनी कळविले आहे.

## छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी आवाहन

बीड । प्रतिनिधी

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत दहावीमध्ये ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप ओगले यांनी केले आहे.

## वंचित बहुजन आघाडी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढणार



बीड। प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडीने भाजप सोडता इतर कोणत्याही पक्षासोबत युती करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी तयारीचा शुभारंभ बीड येथून करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या बीड जिल्ह्यातील निरीक्षक पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक बीड येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली.या बैठकीस निरीक्षक अंकुश जाधव, भारत तांगडे यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीचे आयोजन बीड शहराध्यक्ष लखन जोगदंड आणि तालुकाध्यक्ष किरण वाघमारे यांच्या पुढाकारातून करण्यात आले.

बैठकीत महासचिव खंडू नाना जाधव, अंकुश जाधव व भारत तांगडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी भाजप वगळता इतर पक्षांशी स्थानिक स्तरावर युती करण्याचे निर्देश दिले असून, त्यानुसार बीड जिल्ह्यातील रणनीती आखण्यासाठी ही बैठक घेण्यात आली. बैठकीत जिल्हा परिषद, नगरपरिषद तसेच विविध गण व गटांचा आढावा घेण्यात आला. गावनिहाय आणि वार्डनिहाय ठिकाणी पदाधिकारी नियुक्त नसलेल्या ठिकाणी लवकरच नेमणुका करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. इच्छुक उमेदवारांची चाचपणी लवकरच सुरू करण्यात येईल, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले. या वेळी निरीक्षक भारत तांगडे यांनी जिल्ह्यातील निवडणूक तयारी व उपाययोजना यावर सविस्तर माहिती दिली. बैठकीस खंडू नाना जाधव, सुरेश पोतदार, ज्ञानेश्वर कवठेकर, मिलिंद सरपते, पुरुषोत्तम वीर, रोहन मगर, जंजाळ सर, अनितात‍ाई चक्रे, तुरुकुमारे मॅडम, उमेश तळवे, संदीप जाधव, विनोद भाई, पाशा भाई, श्रीकांत वाघमारे, राजेश कुमार जोगदंड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीमुळे बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीची रणनिती अधिक स्पष्ट झाली असून, युतीचा अजेंडा पुढे नेण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## लिंबागणेश येथे उभारला जाणार १०१ फूट उंच भगवा ध्वज

### हिंदू संस्कृतीचे भव्य प्रतीक; ग्रामस्थांच्या सहकार्यातून उपक्रमास सुरुवात





लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पवित्र तीर्थक्षेत्र लिंबागणेश येथील भालचंद्र गणपती देवस्थान परिसरात १०१ फूट उंच भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे. हिंदू संस्कृती, परंपरा व त्यागाचे प्रतीक असलेल्या या भगव्या ध्वजाच्या स्थापनेसाठी १४ जुलै रोजी सोमवारी सकाळी भूमिपूजनाने शुभारंभ करण्यात आला. या ऐतिहासिक क्षणी गावातील प्रतिष्ठित नागरिक, भक्तगण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवा ध्वज म्हणजे केवळ कापड नव्हे, तर हिंदू धर्माची शौर्यपर परंपरा, एकता, त्याग आणि आध्यात्मिक उन्नतीचे प्रतीक मानला जातो. या ध्वजामुळे लिंबागणेशची धार्मिक ओळख अधिक दृढ होणार असून, भालचंद्र गणपती मंदिराला नव्या आध्यात्मिक उंचीवर नेण्याचा ग्रामस्थांचा संकल्प आहे.

विशेष म्हणजे या उपक्रमासाठी कोणतीही संस्था वा मंडळ पुढे न येता, संपूर्ण ग्रामस्थांनी एकत्र येऊन हे कार्य हाती घेतले आहे. तरुण वर्ग, महिलावर्ग, ज्येष्ठ नागरिक व सर्व भक्तगणांनी श्रमदान, आर्थिक साहाय्य व सक्रिय सहभाग दिला आहे. सामूहिक प्रयत्नातून हा उपक्रम साकारला जात असल्याने सामाजिक ऐक्याचे मूर्त उदाहरण सादर होत आहे .नियोजनबद्ध कार्यक्रम व धार्मिक वातावरण ध्वज उभारणीपूर्वी स्तंभबांधकाम, संरचना व परिसर सुशोभीकरणाचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहे. येत्या संकष्टी चतुर्थीपूर्वी भगवा ध्वज उभारण्याचे लक्ष्य असून, त्या पार्श्वभूमीवर हभप कीर्तन, हरिपाठ, गजर, आरती अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होणार आहे. संपूर्ण गावात या उपक्रमामुळे भक्तिभाव आणि उत्साहाचे वातावरण आहे. भगवा ध्वज केवळ उंचीने नव्हे, तर भाविकांच्या मनात श्रद्धा, गौरव आणि हिंदुत्वाची जाणीव जागृत करणारा ठरणार आहे. लिंबागणेश गावाच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीचे प्रतीक म्हणून हा ऐतिहासिक उपक्रम कायम लक्षात राहील, यात शंका नाही.

## अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे जनसुरक्षा विधेयक रद्द करा -डॉ.तांदळे



बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने जनसुरक्षा विधेयक गुरुवारी विधानसभेत आणि शुक्रवारी वरिष्ठ सभागृह म्हणजे विधान परिषदेत आवाजी मतदानाने पारित करण्यात आले. जनसुरक्षा विधेयक सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते संविधान रक्षणासाठी लढणारी मानवाधिकारी कार्यकर्ते, पत्रकार संघटना, सामाजिक कार्यकर्ते संघटना, यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे, आंदोलनाचा आवाज दाबणारे आणि लोकशाही अस्थिर करणारे असून हुकूमशाही कडे वाटचाल करणारे राजकीय हेतूने प्रेरित राजकीय अजेंडा राबविण्यासाठी मंजूर केलेले विधेयक आहे. एकीकडे नक्षलवाद आणि दहशतवादाचा बिमोड करायचा असे सांगितले जाते.

परंतु जनसुरक्षा विधेयकात कुठेही नक्षलवाद किंवा दहशतवाद हा शब्द नाही. राज्यातील नक्षलवाद संपला आहे असं सारकार म्हणत असताना मग जन सुरक्षा कायदा कोणासाठी असाही प्रश्न उपस्थित होतो. व्यक्ती वा संघटना यांनी शाब्दिक अथवा कृतीद्वारे सार्वजनिक सुरक्षा, शांतता, सौहार्द यांस धोका निर्माण करणे वा शांतता सौहार्द राखणाच्या सरकारच्या प्रयत्नात ढवळाढवळ करणे ,प्रशासनास वा सरकारी कर्मचाऱ्यांच्या जबाबदारी निर्ववहनात अडथळा आणणे, हिंसक कृत्य करणे वा हिंसाचारास उत्तेजन देणे, जनतेच्या मनात दहशत निर्माण होईल असे कृत्य करणे ,आज्ञाभंग वा कायदे भंगास उत्तेजन व हे सर्व करण्यासाठी निधी वा सामग्री जमा करणे इत्यादींचा जन सुरक्षा कायद्यात उल्लेख असून सत्ताधारी पक्ष याचा गैरवापर करण्याची दाट शक्यता असल्याने हे जन सुरक्षा नव्हे तर जनमुस्कटदाबी विधेयक तातडीने रद्द करण्यात यावे अशी मागणी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी दि. १४ जुलै २०२५ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे .यावेळी सुदाम कोळेकर डॉ. लक्ष्मण पवळ आदींची उपस्थिती होती.

## गजानन महाराज पालखी मुळे वाहतुक मार्गात तीन दिवस बदल



जालना। प्रतिनिधी

श्री गजानन महाराज संस्थान शेगाव या न्यासाची श्री ची पालखी पायदळ वारी परंपरेनुसार सदर पालखी पंढरपुर येथून परतीच्या मार्गावर आहे. या दिंडीमध्ये जवळपास ८०० वारकरी सहभागी आहेत. तरी राष्ट्रीय महामार्गावरील येणारी व जाणारी वाहतूक व्यवस्थेच्या सुनियमनासाठी दि.१९ जुलै ते २१ जुलै २०२५ या कालावधीत वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आला आहे.शनिवार दि.१९ जुलै २०२५ रोजी सकाळी ८ ते रात्री ११ वाजेपर्यंत हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरील उड्डानपुलाखालून व बाजुने अंबडकडे येणारी अवजड वाहने थांबवून सदरील वाहने पाचोड-अंबड मार्गे जालनाकडे जातील तर जालनाकडून शहागडकडे जाणारी वाहने अंबड पाचोड मार्गे जातील.

रविवार दि.२० जुलै २०२५ रोजी सकाळी ३ वा जेपासून रात्री ११ वाजेपर्यंत हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरील उड्डानपुलाखालून व बाजुने अंबडकडे येणारी सर्व अवजड वाहने थांबवून पाचोड-जामखेड फाटा-जामखेड-किनगाव चौफुली-बदनापूर मार्गे जालनाकडे जातील तसेच जालनाकडून येणारी वाहने बदनापूर-किनगाव चौफुली-पाचोड मार्गे शहागडकडे जातील. शहापुर ते शहाकड व अंबड ते पाचोड मार्गावरील गावातील अवजड वाहनांनी याच मार्गाचा वापर करावा तसेच पारनेर फाटा ते छत्रपती संभाजीनगर महामार्गापर्यंतच्या गावातील अवजड वाहनांनी याच मार्गाचा वापर करावा. सोमवार दि.२१ जुलै २०२५ रोजी सकाळी ३ ते रात्री ११ वाजेपर्यंत हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरील उड्डानपुलाखालून व बाजुने अंबडकडे येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंद करुन सदर वाहने वडीगोद्री-पाचोड-जामखेड फाटा-जामखेड-किनगाव चौफुली-बदनापूर मार्गे जालनाकडे जातील. तसेच जालनाकडून येणारी वाहने बदनापूर-किनगाव चौफुली-जामखेड-जामखेड फाटा- पाचोड मार्गे शहागडकडे जातील. तसेच अंबडकडून जालनाकडे जाणारी अवजड वाहने सकाळी ३ ते रात्री ११ वाजेदरम्यान बंद करुन सदर वाहने किनगाव चौफुली-बदनापूर मार्गे जालनाकडे जातील. व जालनाकडून अंबडकडे येणारी अवजड वाहने बदनापूर-किनगाव चौफुली-जामखेड-पाचोड मार्गे शहागडकडे जातील. दि.१९ जुलै ते २१ जुलै २०२५ या कालावधीत जालनाकडून घनसावंगीकडे जाणारी वाहने रोहनवाडी-सुतगिरणी मार्गे घनसावंगीकडे जातील व घनसावंगीकडून जालनाकडे जाणारी वाहने त्याच मार्गे जालनाकडे जातील.घनसावंगीकडून बीडकडे जाणारी वाहने तिर्थपुरी-गोंदी-शहागड मार्गे बीडकडे जातील. या प्रमाणे पर्यायी मार्गाने वाहतुक वळविण्यात आली आहे. तरी सर्व वाहनधारकांनी याची नोंद घ्यावी. असे असे आदेश पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी जारी केले आहेत.

---

**जाहिर प्रगटन**

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-७०**
**दिनांक -११/०७/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती बाबासाहेब रामनाथ जाधव रा. शिरनेर ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगीच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अचल बाबासाहेब जाधव | मुलगी | २२/१०/२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक-११/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

---

**जाहिर प्रगटन**

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६९**
**दिनांक -०३/०७/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती बाबासाहेब रामनाथ जाधव रा. शिरनेर ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगीच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | धनश्री बाबासाहेब जाधव | मुलगी | ०६/०४/२०१७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक-०३/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

---

**जाहीर प्रगटन**

### मा. श्री. अ.सं. जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज नं.२०९/२०२५**
**मार्फत आर. के. बडे**
**सतिश वि. निल**

अर्जदार : १. सतिश पि.अच्युतराव केदार, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. वारणी, ता. शिरूर कासार, जि. बीड अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत. ज्यापोक्षा मयत नामे सिंधुबाई भ्र. अच्युतराव केदार यांचा मृत्यू दि. ०४.०९.२०२० रोजी मौजे वारणी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार है उपरोक्त मयत याचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २८.०८.२०२५ ही आहे.

स्वाक्षरीत
**क. लिपीक**

आदेशावरुन
स्वाक्षरीत
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर. शिरूर का.

---

## दिव्यांग, ज्येष्ठांना मोफत कृत्रिम साहित्य वाटपासाठी पूर्व तपासणी शिबिर

बीड। प्रतिनिधी

खासदार बजरंग सोनवणे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यामध्ये दिव्यांग व्यक्ती व जेष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य साधने वाटपाच्या अनुषंगाने पूर्व तपासणी शिबिर प्रत्येक तालुक्यातील पंचायत समितीत १८ ते ३० जुलै २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घान १८ जुलै रोजी सकाळी १० वा. खासदार सोनवणे यांच्या हस्ते केज येथे होणार आहे. या शिबिराचा दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी एस. एन. मेश्राम व सर्व गटविकास अधिकारी यांनी केले आहे.

शिबिरात दिव्यांगांना जयपुरी फूट, कृत्रिम हात, कॅलीपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, वॉकिंग स्टीक, ब्रेल किट, स्मार्ट फोन, श्रवणयंत्र यासह जेष्ठ नागरिकांना बेल्ट, वॉकर, काठ्या, चष्मे, कृत्रीम दात, खुबड, कृत्रीम अवयव, श्रवणयंत्र, व्हिलचेअर कमोडसहीत, सिलीकॉन खोम तकीया, नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर यासह इतर साधने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी दिव्यांगांनी दिव्यांग प्रमाणपत्र आणि कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, वार्षिक उत्पन्नाचा दाखला उत्पन्न (मासिक २२ हजार ५०० रु. किंवा वार्षिक २ लक्ष ७० हजार रूपयांच्या आत असावे.) सोबत आणावीत. जेष्ठ नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, वर्षिक उत्पन्नाचा दाखला उत्पन्न (मासिक १५ हजार रु. किंवा वर्षिक एक लक्ष ८० हजार रूपयांच्या आत असावे) सोबत कागदपत्रे आणावयाची आहेत.केज येथे १८, अंबेजोगाई १९, बीड २१, माजलगाव २२, पाटोदा २३, वडवणी २४, आष्टी २५, धारूर २६, परळी वै.२८, शिरूर २९ आणि गेवराई येथे ३० तारखेला संबंधित पंचायत समिती कार्यालयात सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत शिबिरांचे आयोजन करण्यात आले असल्याचेही श्री. मेश्राम यांनी कळवले आहे.

राज्य लोकतंत्र
बुधवार, दि.१६ जुलै २०२५ | ६

# आदिवासी विकास आढावा समितीच्या अध्यक्षांची पोलिसांच्या कार्यपद्धतीवर नाराजी

## वेठबिगारीप्रकरणी आयुक्तांमार्फत चौकशी करणार –विवेक पंडित

**आष्टी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील गहूखेल येथील सेवालाल तांडा येथील शेठजीकडे राज्यासह, परराज्यातील कोळसा भट्टीवर काम करणाऱ्या लोकांना उचल देऊन बाहेर ठिकाणी पाठवले जाते. त्याची मुले शेठजीच्या घरी ठेवले जातात. या मुलाकडून धुणी, भांडी, शेण काढणे, त्याचे हातपाय दाबून देणे, जनावरांचा संभाळ करणे अशी कामे मनाविरूध्द करून घेतले जात आहेत. त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात आहे. या प्रकरणात पोलिसांची भूमिका संशयास्पद असून याबाबत मी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांच्याशी चर्चा करून विभागीय आयुक्तांमार्फत या प्रकरणाची चौकशी करणार असल्याचे राज्य आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडीत यांनी सांगितले.**



आष्टी तहसिल कार्यालयातील सभागृहात सोमवारी सकाळी ११ विवेक पंडीत यांनी तालुक्यातील सेवालाल तांडा येथील वेठबिगारी प्रकरणाचा आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. म याप्रसंगी तहसीलदार वैशाली पाटील, पोलिस उपविभागीय अधिकारी हनुमंत हनपुडे, अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे व महिला बालकल्याण विभागाचे अधिकारी, बालकल्याण समितीचे सदस्य उपस्थित होते. पंडित म्हणाले, ही घटना १७जून रोजी उघडकीस आली २० जून रोजी येथील मुलांची मुक्तता करून बालसुधारगृहात टाकण्यात आले.२५ तारखेला मुलांचे जबाब घेतले. त्यानंतर या प्रकरणात ११ जुलै रोजी गुन्हा दाखल होतो. म्हणजे हा गुन्हा दाखल करायला पोलिसांना २० दिवस का लागले असा सवाल पंडित यांनी केला. या प्रकरणाचा ४ दिवसांत अहवाल द्यावा, मुक्तता केलेल्या मजुरांना १० हजार रुपये सहाय्य देण्याबाबत पत्र देऊ असे त्यांनी सांगितले.

### बालकल्याण समितीवर ताशेरे

**यावेळी पंडित यांनी बीडच्या बालकल्याण समितीने या प्रकरणात गांभीर्याने काम केले नसल्याचे सांगून त्यांच्या कामकाजावरही ताशेरे ओढले. आष्टी तहसिलदार वैशाली पाटील यांनी स्वतः लक्ष घालून मजूरांची सुटका करून गुन्हा दाखल करण्यासाठी सर्व कागदोपत्राची पुर्तता करण्यात तत्परता दाखवल्याबद्दल त्यांच्या कामाचे कौतुक केले.**

# धारूरच्या मुख्य बाजारपेठेतील नव्या रस्त्याचे काम खुलेआम बोगस सुरू

धारूर । प्रतिनिधी

शहरात मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यांचे सिमेंट- कॉंक्रीटीकरणाचे काम सुरू आहे.रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्यात येत आहे, या मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असून, याकडे बांधकाम विभाग धारूर उप.विभागीय उपअभियंता सचिन कांबळे यांच्या सह सा.बा विभागाचे अधिकारी यांनी गुत्तेदाराशी संगणमत करून धारूरकरांचे स्वप्न असलेला



रस्त्यात बोगसगिरीचा सपाटा चालू असल्याचे नागरिकात बोलले जात आहे,मात्र सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करताना प्रथम आवश्यक ते खोदकाम करून त्यामध्ये चार इंच जाडीच्या दगडांचा अर्धा फूट थर टाकून त्यावर थोडा मुरूम टाकून रोड रोलरने दबाई करावी लागते. नंतर त्यावर सिमेंट कॉंक्रिटीकरणाचा थर टाकण्यात येतो, परंतु,असे न करता,पहिलाच डांबरी रस्त्याला टोकरून, खोदकाम न करता माती मिश्रित कपचीचा वापर करण्यात येत आहे, हा सर्व प्रकार संबंधित अधिकाऱ्यांना माहित असताना,त्यांना होत असलेला बोगस रस्ता डोळ्यात माती गेल्यामुळे दिसना की काय..? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये ◀◀ पान ३ वर

# ताडसोन्ना नदीपात्रातील वाळू उपशावर पिंपळनेर पोलिसांचा छापा

## वाळूसह जेसीबी, ट्रॅक्टर असा ३८ लाखाचा ऐवज जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ताडसोन्ना नदीपात्रात अवैध वाळू उपसा चालू असल्याची माहिती मिळाल्यावरुन पिंपळनेर पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकून जेसीबी, ट्रॅक्टरसह ३८ लाखाचा माल जप्त केला. ही कारवाई १५ जुलै रोजी करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी प्राप्त झाली की ताडसोना शिवारातील नदीपात्रात काही



व्यक्ती जेसीबीच्या सहाय्याने वाळू उपसा करून ट्रॅक्टरद्वारे बेकायदेशीररीत्या चोरटी वाहतूक करत आहेत.


सदर माहितीच्या अनुषंगाने सपोनि मधुसूदन घुगे, ग्रेड ए.बी. शेळके, पो.शी. ८८७ सानप, पो.शी. २०२१ ढाकणे, पो.शी. १९०४ पिंपळे, पो.शी. १६३७ धोंडे यांनी पंचांसह दुपारी १४.३० वा. घटनास्थळी छापा टाकला. कारवाई दरम्यान जेसीबी मालक दत्ता नवनाथ घरबुडे, रा. वडवणी हा घटनास्थळी मिळून आला. सदर ठिकाणी एक जेसीबी, एक ट्रॅक्टर, दोन ट्रॉली असा एकूण रुपये ३८,००,०००/- (अक्षरी रुपये अडतीस लक्ष फक्त) किंमतीचा मुद्देमाल मिळून आला आहे. कारवाईदरम्यान ट्रॅक्टर चालकांनी पोलीस व पंच यांना पाहून ट्रॅक्टर ट्रॉलीतील वाळू जागीच ◀◀ पान ३ वर

# माजलगावात चातुर्मासाचा शुभारंभ

## प.पू.पद्मऋषीजी म.सा. व प.पू. शालीभद्रजी म.सा. यांचे सानिध्य लाभदायक – भाविकांनी प्रवचनाचा लाभ घ्यावा

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरात प.पू.पद्मऋषीजी म.सा. व प.पू.शालीभद्रजी म.सा.यांच्या पावन सानिध्यात चातुर्मासाचा शुभारंभ झाला आहे. या पवित्र चातुर्मास काळात दररोज विविध आध्यात्मिक विषय व जीवन शैलीवर आधारित प्रवचन तसेच विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या संपूर्ण चातुर्मास काळात प.पू.गुरूमहाराजांच्या ज्ञानमय



प्रवचनांचा लाभ घेता येणार असून, त्यांच्या मंगल दर्शनाने भक्तगणांना आत्मिक शांती व आध्यात्मिक उन्नतीचा अनुभव मिळणार आहे.या पर्वाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन स्थानिक जैन संघटनेकडून करण्यात आले आहे.भाविकांनी दररोज आयोजित होणाऱ्या प्रवचनांना उपस्थित राहून धर्म, संयम व साधनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### दररोज होणाऱ्या प्रवचनास उपस्थित रहा

**माजलगाव शहरातील मठ गल्ली भागात असणाऱ्या जैन स्थानक येथे दररोज सकाळी ८:४५ ते ९;४५ वेळेत प्रवचनाचे आयोजन केलेले आहे..तरी परिसरातील, तसेच सर्व समाजातील भाविक-भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.**

# आगामी निवडणूकासाठी शिवसैनिकांनी सज्ज व्हावे-वरेकर

**बीड । प्रतिनिधी**

**आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर पालिकेच्या निवडणूकीसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या शिवसैनिकांनी सज्ज रहावे असे आवाहन संपर्कप्रमुख परशुराम जाधव व जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी शिवसैनिकांच्या बैठकीत केले.**



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायक राऊत, संपर्कनेते सुनिल प्रभू, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड व माजलगाव मतदार संघातील पदाधिकारी व शिवसैनिक यांची आढावा बैठक संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका प्रमिलाताई माळी, जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, वडवणी तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, धारूर तालुकाप्रमुख बाबा सराफ, यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बीड शहरातील सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स येथील मध्यवर्ती कार्यालयात संपन्न झाली यावेळी बोलताना संपर्कप्रमुख परशुराम जाधव व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर म्हणाले की, येत्या दोन महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका पार पडणार आहेत त्यासाठी आजपासूनच प्रतेक गट ,गण व वार्डात आपला संभाव्य उमेदवार आपल्याला तयार करून ठेवायचा आहे, ज्यांना निवडणुक लढवायची आहे त्यांनी आजपासूनच कामाला लागून लोकांच्या संपर्कात रहायचे आहे, पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकायचे स्वप्न पूर्ण करायचे आहे, महाराष्ट्रातील महायुतीच्या शासनाने दिलेल्या फसव्या आश्वासनाचा जनतेपुढे पदार्पश करा, शेतकऱ्यांना या शासनाने दिलेल्या फसव्या आश्वासनाचे काय झाले याचा पाढा जनतेसमोर वाचून दाखवा, उद्धवसाहेब ठाकरे मुख्यमंत्री असताना केलेल्या कामाचं अवलोकन जनतेसमोर करा, एकंदरीत केंद्रातील व महाराष्ट्रातील हुकुमशाही असलेल्या सरकारला वठणीवर आणण्यासाठी येणाऱ्या निवडणुकीत विजय प्राप्त करण्यासाठी एकदिलाने कामाला लागण्याचे आवाहन संपर्कप्रमुख जाधव व जिल्हाप्रमुख वरेकर यांनी पदाधिकारी व शिवसैनिकांना केले.यावेळी जिल्हा संघटक ज्ञानेश्वर जाधव,सहसचिव श्रीकृष्ण गायके, विधानसभा प्रमुख नामदेव सोजे,बीड तालुका सचिव नंदु येवले, अल्पसंख्याक बीड तालुकासंघटक नसीर पठाण, युवा सेना वडवणी तालुकाप्रमुख नवनाथ मोरे,महिला आघाडीच्या वडवणी तालुकाप्रमुख कौशल्या कदम, महिला आघाडीच्या माजलगाव तालुकाप्रमुख सुनिता जाधव, वडवणी महिला शहरप्रमुख शेषीकला अवचार,आशाताई लोखंडे,युवराज शिंदे, अशोक गोंडे, ◀◀ पान ३ वर

# प्रविण गायकवाड यांच्यावरील जीवघेण्या हल्ल्याचा निषेध

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविणदादा गायकवाड यांच्यावर नुकताच अक्कलकोट येथे जिवघेणा हल्ला करणारा शिवधर्म प्रतिष्ठानचा कार्यकर्ता दिपक काटे व त्याचे सर्व सहकारी यांच्यावर मोक्का अंतर्गत कार्यवाही करावी, तसेच गायकवाड यांना झेड प्लस सुरक्षा देण्यात यावी अशी मागणी करीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) कडून मंगळवारी अंबाजोगाईत तीव्र निदर्शने करण्यात आली. या निदर्शनाचे नेतृत्व मराठवाडा



विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी केले. यावेळी मागणीचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत देण्यात आले.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविणदादा गायकवाड यांच्यावर नुकताच अक्कलकोट येथे करण्यात आलेल्या जिवघेणा हल्ला याच्या निषेधार्थ सोमवार, दिनांक १५ जुलै रोजी उपविभागीय कार्यालयासमोर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) यांनी केलेल्या निदर्शन आंदोलनाने परिसर दणाणून सोडला. सरकार आणि व्यवस्थेविरोधात निषेधाच्या घोषणा देत, झेंडे घेऊन शेकडो स्त्री, पुरूष व ज्येष्ठ नागरिक या निदर्शन आंदोलनात सहभागी झाले. या बाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी सांगितले की, आमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिनजी खरात यांच्या नेतृत्वाखाली अंबाजोगाईत मंगळवार, दिनांक १५ जुलै रोजी उपविभागीय कार्यालयावर निदर्शन आंदोलन करण्यात आले.

# आरोग्य विभागांतील चौकशी करून अहवाल तात्काळ पाठवा –डॉ.उल्हास गंडाळ

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुका आरोग्य अधिकारी हे सतत कार्यालयात गैरहजर राहत असून त्याचप्रमाणे तालुक्यातील असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये रुग्णांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत याबाबत विविध वृत्तपत्रात बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या त्यानुसार पाटोदा तालुका आरोग्य अधिकारी यांची चौकशी संदर्भात समिती नेमण्यात आली असून या समितीने तात्काळ चौकशी करून अहवाल स्वयंस्पष्ट सादर करावा असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर उल्हास गंडाळ यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे याबाबत अधिक माहिती अशी की पाटोदा तालुक्यात असणारे प्राथमिक आरोग्य केंद्र यामध्ये डॉक्टर वेळेवर राहत नाही त्याचप्रमाणे रुग्णांची मोठ्या प्रमाणात हाल होत आहे याकडे सातत्याने तालुका आरोग्य अधिकारी हे दुर्लक्ष करत आहेत व ते सतत गैरहजर कार्यालयात राहतात या संदर्भात विविध वृत्तपत्रात बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या त्यानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जा.क्र.जिप बीड/आवि आस्था- १ कावी- ४८५/२०२५ बीड क्रमांक १७० दि१४/७/२०२५ नुसार डॉक्टर बालासाहेब लोमटे सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.बीड डॉक्टर राजेश तांदळे तालुका आरोग्य अधिकारी आष्टी. सतीश चक्रे. जिल्हा लेखा व्यवस्थापक राष्ट्रीय मिशन बीड यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की पाटोदा तालुक्यात असणारी आरोग्य तालुका आरोग्य अधिकारी हे सतत गैरहजर राहत असून रुग्णांची हाल होत आहेत त्याचप्रमाणे पाटोदा तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्रावर खर्च दाखवून निधी उचलला असल्यास या संदर्भात सर्व प्रकरणाची तात्काळ चौकशी करून अहवाल स्वयं स्पष्ट अभिप्राय तात्काळ कार्यास सादर करावा असे पत्रात डॉ. उल्हास गंडाळ.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी म्हटले आहे.

# शेतकऱ्यांना मोठ्या व दमदार पावसाची प्रतीक्षा

## दुबार पेरणीचे संकट, पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली * आठ महसुली मंडळात ९० टक्के खरीपाच्या पेरण्या

ज्योतीराम पांढरपोटे । माजलगांव

तालुक्यातील तालखेड, टाकरवण, किट्टी आडगाव,मंजरथ, माजलगाव, गंगामसला,नित्रुड व दिंद्रुड या महसूल मंडळात पावसाळा सुरू होऊन दीड महिने झाले, त्यातही पावसाचे प्रमाण कमी अन्? ढगाळ वातावरणाचेच प्रमाण जास्त राहत आहे.रिमझिम पावसाशिवाय तालुक्यातील ८ मंडळात मोठा आणखी दमदार पाऊस झाला नाही, परिणामी तालुक्यातील आठ ही महसुली मंडळातील शेतकऱ्यांना मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे.दमदार





व मोठ्या पावसा अभावी पिकांची वाढ खुंटली असून शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत.

जून आणि जुलै या दोन महिन्यांचा कालावधी पिकांच्या वाढीसाठी महत्त्वाचा असतो. परंतु अद्यापही पाऊस नसल्याने कापूस,सोयाबीन या पिकांची वाढ म्हणावी तशी झालेली नाही. काही ठिकाणी पिकाचे मूळ करपत असल्याचे,तसेच पिके पिवळी पडू लागल्याचे शेतकरी सांगत आहेत.तर काही भागांत पिकांवर मावा रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याच्या तक्रारी येत आहेत.जून आणि जुलै या दोन महिन्यांच्या ◀◀ पान ३ वर

> **“ पावसाअभावी यंदा खरिपाच्या पिकांची परिस्थिती बिकट झाली आहे.त्यात वन्यप्राण्यांकडून सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. ही पिके जगवायची कशी,असा प्रश्न आमच्यासमोर आहे.**
> **– अनुरथ सुरवसे शेतकरी,**

> **“ पावसाळ्याचे दोन महिने सरले,तरीही नदी-नाले कोरड्येच आहेत.विहिरीची पाणीपातळी खालावत चालली आहे. हीच परिस्थिती राहिली तर पिकेवाचवणे जिकिरीचे होणार आहे.**
> **–पंडीत सोळंके शेतकरी**

# शाळा,महाविद्यालय,खाजगी शिकवणी परिसरात रोड रोमिओचा सुळसुळाट

**आष्टी । प्रतिनिधी**

**शाळा, महाविद्यालय, खाजगी शिकवणीसाठी शहरात मुलीची संख्या मोठी आहे.पण याच परिसरात टवाळखोर घिरट्या घालत असल्याने मुलींना नाहक मनस्ताप सहन करण्याची वेळ आली असून पोलिसानी सकाळी शाळा भरण्याच्या वेळेत व सुटण्याच्या वेळेत ठिकठिकाणी थांबण्याची मागणी केली जात आहे.**

आष्टी तालुक्यातील आष्टी, अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत आष्टी शहरातील अनेक शाळा महाविद्यालय खाजगी क्लासेस याचा समावेश आहे.त्यातच आष्टी, कडा, येथे महाविद्यालय, खाजगी क्लासेस आहेत तसेच जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. ग्रामीण भागातून आलेल्या मुलीना येताना, जाताना, रोडरोमिओच्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने मोठा मनस्ताप मुलीना सहन करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे पोलिसांनी सकाळच्या वेळेत व सुटण्याच्या दरम्यान चौका चौकात व शाळा,महाविद्यालय परिसरात थांबून रोडरोमिओचा बंदोबस्त करावा अशी मागणी शिवनेरी ग्रूपचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते संदिप खाकाळ यांनी केली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातील राजीव गांधी प्राणी संग्रहालयात १५ हरणांचा मृत्यू; कारण अद्याप अस्पष्ट



**पुणे । प्रतिनिधी**

**राजीव गांधी प्राणी संग्रहालयातील १५ चितळ प्रकारातील हरणांचा अचानक मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे प्राणी संग्रहालय प्रशासन आणि पुणे महानगरपालिकाही चक्रावून गेली आहे. प्राथमिक माहितीनुसार, यामागे एखाद्या साथीच्या आजाराची शक्यता वर्तवली जात असली तरी, अद्याप मृत्यूचे नेमके कारण अस्पष्ट आहे. प्राणीसंग्रहालयात एकूण ९८ चितळ प्रकारातील हरणे होती, त्यापैकी १५ हरणांचा मृत्यू झाल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. तर दुसरीकडे ४ ते ५ दिवसांपासून हा प्रकार सुरु असताना महापालिका प्रशासाने हि माहिती सपवण्याच प्रय़त्न केल्याचे दिसून येत आहे.**

मृत हरणांचे शवविच्छेदन (पोस्ट मार्टेम) क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय केंद्र आणि महाराष्ट्र शासनाच्या पशु रोग तज्ञांनी केले आहे. तसेच, मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी मृत हरणांचे जैविक नमुने विभागीय वन्यजीव प्रशिक्षण केंद्र नागपूर, बरेली, भोपाळ आणि ओरिसा येथील भुवनेश्वर येथील नामांकित प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. या अहवालानंतर मृत्यूचे खरे कारण समोर येण्याची शक्यता आहे. या घटनेच्या अनुषंगाने आणखी एक महत्त्वाचा पैलू तपासला जात आहे. जर हा साथीचा रोग असेल, तर त्याचा मनुष्यावर काही परिणाम होऊ शकतो का, याचीही तपासणी केली जात आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासन सतर्क आहे.

गेल्या चार ते पाच दिवसात आमच्याकडील एकूण १६ हरणांचा अचानक मृत्यू झाला आहे. मृत्यू होण्यापूर्वी त्यांच्यामध्ये कोणतीही लक्षणे आढळून आलेली नाहीत. त्यामुळे या घटनांच्या मृत्यूबाबत विविध पातळ्यांवर तपासणी केली जात आहे, शहरातील आणि शहराबाहेरील काही महत्त्वाच्या नामांकित प्रयोगशाळांना जैविक नमुने पाठवण्यात आले आहेत. त्यांचा अहवाल तीन चार दिवसात आम्हाला प्राप्त होईल हा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच या घटनेमाचे नेमके कारण स्पष्ट होईल.

– डॉ. घनश्याम पवार, पशुवैद्यकीय अधिकारी, राजीव गांधी प्राणीसंग्रहालय, पुणे

### विधानसभेत आमदार रासनेंनी विचारला प्रश्न

कात्रज येथील प्रसिद्ध राजीव गांधी प्राणी संग्रहालयात मागील मागील चार ते पाच दिवसांत तब्बल १५ हरणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे वन्यजीव प्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. विषाणूजन्य आजाराने हरणांचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. आमदार हेमंत रासने यांनी हरणांच्या मृत्यूचा मुद्दा विधानसभेत मांडत प्रशासनाने इतर प्राण्यांना धोका होऊ नये, यासाठी योग्य उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. कात्रज येथील राजीव गांधी प्राणीसंग्रहालय गेली दोन दिवसात १५ हरणांचा अचानक मृत्यू झाला असून अद्याप पोस्टमार्टम रिपोर्ट आलेला नाही. साथीच्या रोगामुळे असे झाल्याची शक्यता आहे, त्यामुळे इतर प्राण्यांना त्याचा काही प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी तातडीने शासनाने योग्य उपाययोजना करण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी रासने यांनी केली आहे.



# पोलीस भरती करणाऱ्या विद्यार्थ्यांना पैलवानांकडून मारहाण, व्हिडीओ व्हायरल

पुणे । प्रतिनिधी


पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तळजाई टेकडी येथे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना काही पैलवानांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, ही घटना मंगळवारी घडली असल्याची माहिती आहे.

याबाबत एका विद्यार्थिनींनी सांगितले की , सुमारे दीडशे ते दोनशे विद्यार्थी नेहमीप्रमाणे तळजाई टेकडीवर वर्कआउट करण्यासाठी आले होते. सर्व विद्यार्थी हे पुणे फिटनेस क्लब या अकॅडमी चे विद्यार्थी आहेत. मुजीब पठाण हे या अकॅडमीचे संचालक आहेत.

विद्यार्थिनीने सांगितले की, सकाळी नेहमीप्रमाणे वर्कआउट करण्यासाठी आलो असता अचानक काही पहिलवान आले. त्यांनी विद्यार्थ्यांना मारहाण केली. तसेच मुलींकडे बघून शिवीगाळ केली आज त्यांच्या दिशेने दगडफेक केली. तसेच, अकॅडमीचे संचालक मुजीब पठाण यांनाही पैलवानांनी मारहाण केली. मात्र त्यांनी तसे का केले याचे कारण समजू शकले नाही.

दरम्यान, हे पहिलवान हनुमान आखाडा आणि मामासाहेब मोहोळ आखाड्यातील असल्याचा आरोप या विद्यार्थिनीने केला. तसेच मारहाण करताना आमच्यावर वरिष्ठ पोलीस अधिकारी राहुल आवारे आणि विजय चौधरी यांचा हात असून तुम्हाला काय करायचे ते करा अशी धमकी देखील या पैलवानांनी दिल्याचे विद्यार्थिनीने सांगितले. याप्रकरणी पोलिसांत तक्रार देणार असल्याचे विद्यार्थिनींने सांगितले.

# सततच्या त्रासाला कंटाळून भावाकडून भावाचा खून; बिबवेवाडीतील घटना




पुणे – सतत मद्यपान करुन कुटूंबाला त्रास देत असलेल्या छोट्या भावाचा मोठ्या भावाने चाकूने वार करुन खून केला. ही घटना सोमवारी सकाळी अप्पर सुपर येथे घडली. याप्रकरणी बिबवेवाडी पोलिसांनी भावाला ताब्यात घेतले आहे. त्याच्या विरुध्द खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रवीण उर्फ ऋतिक दत्तात्रय नवले ( रा. अप्पर सुपर, गणेश नगर) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्याचा खून केल्याप्रकरणी त्याचा मोठा भाऊ अनिकेत दत्तात्रेय नवले (२६) याला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, प्रवीण कोणताही कामधंदा करत नाही. तो सतत मद्यपान करुन घरामध्ये भांडणे करायचा. या भांडणाला अनिकेत आणि कुटूंब वैतागले होते. त्याने रविवारी रात्रीही भांडणे केली होती. यामुळे अनिकेतची पत्नी मुलीला घेऊन माहेरी गेली होती. दरम्यान आज(सोमवारी) सकाळी पुन्हा दोघा भावांमध्ये वाद झाले. यावेळी घरात आई-वडिलही होते. रागाच्या भरात अनिकेतने प्रवीणच्या पोटात घरातील चाकूने सपासप वार केले. अनिकेत जागेवरच कोसळला. आई-वडिलांनी आरडा ओरडा केल्यानंतर शेजारच्याना घटना घडली. त्यांनी पोलीस नियंत्रण कक्षाला खबर दिली. पोलिस घटनास्थळी दाखल झाले तेव्हा आरोपी अनिकेत घरातच डोक्याला हात लावून बसला होता. पोलिसांनी प्रवीणचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. यानंतर अनिकेतला ताब्यात घेण्यात आले. आरोपी अनिकेतचे वडिलही कोणताच कामधंदा करत नाहीत. त्याची आई धुण्याभाड्यांची तर तो स्वत: मजुरी काम करुन घर चालवतात. याप्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्विनी सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

# ज्ञानोबा – तुकोबांची पालखी यंदा आळंदीत येणार एकत्र

आळंदी : संत ज्ञानेश्वर महाराज यांचे ७५० वे जन्मवर्ष व संत तुकाराम महाराज यांचे ३७५ वे वैकुंठगमन वर्ष अशा दुग्धशर्करा योगाचे औचित्य साधून संत तुकाराम महाराज यांच्या पालखीला परतीच्या प्रवासात आळंदीत दशमीला मुक्कामी येण्याचे निमंत्रण आळंदी देवस्थानने दिले होते. हे निमंत्रण जगद्गुरू संत तुकाराम महाराज संस्थानने स्वीकारले असल्याचे संस्थानचे अध्यक्ष जालिंदर मोरे यांनी सांगितले. यामुळे यंदा तुकोबांची पालखी आषाढी वारीत परतीच्या प्रवासात रविवारी (दि. २०) आळंदीत दाखल होणार आहे. आळंदीत ज्ञानोबा – तुकोबांची पालखी एकत्र येणार आहे.



माउलींची पालखी दशमीला पुण्याहून निघून आळंदीत सायंकाळी दाखल होत असते. याच दरम्यान दुपारच्या विसाव्याला तुकोबांची पालखी दिघी मॅगझिन चौकातून माउलींच्या पालखीसोबत सहभागी होणार आहे. त्यानंतर दोन्ही पालख्यांचे माउलींच्या थोरल्या पादुका मंदिरात स्वागत करण्यात येणार असल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष ड. विष्णू तापकीर यांनी सांगितले. त्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिरापासून दोन्ही पालख्या आळंदीच्या दिशेने मार्गस्थ होणार आहेत. आळंदीत दोन्ही पालख्यांचे जंगी स्वागत करण्यात येणार आहे. तुकोबांचा पालखी सोहळा आळंदीत मुक्कामी राहणार असून, एकादशीला मोशीमार्गे देहूला जाणार आहे.

सन १६८५ साली संत तुकाराम महाराजांचे धाकटे चिरंजीव तपोनिधी नारायण महाराजांनी आषाढी वारी पालखी सोहळा सुरू केला. त्या वेळी जाताना व येताना श्री क्षेत्र आळंदीमार्गेच संत तुकाराम महाराज पालखीचा प्रवास होत होता. त्या आठवणींना या निमित्ताने उजाळा मिळणार असल्याचेदेखील मोरे यांनी सांगितले.

### सतरा वर्षांपूर्वी आल्या होत्या एकत्र

सन २००८ साली परतीच्या प्रवासात संत तुकाराम महाराजांची पालखी दशमीला आळंदीत मुक्कामी बोलविण्यात आली होती. या वेळी आळंदी देवस्थानने त्यांचे स्वागत केले होते. त्यानंतर सतरा वर्षांनी पुन्हा तुकोबांची पालखी आळंदीत येत आहे.


### भोसरी, मोशीकरांसाठी दुर्लभ योग

भोसरी, मोशी पंचक्रोशीतील गावांना तुकोबांच्या पालखीचा गावातून प्रवास होऊन सहवास व सेवा लाभत नाही. यंदा आळंदीत तुकोबांची पालखी येत आहे. पालखी भोसरीमार्गे येणार आहे. आळंदीतून माउलींचा निरोप घेतल्यानंतर तुकोबांची पालखी मोशी, टाळगाव चिखलीमार्गे देहूत दाखल होणार आहे. यामुळे या गावांना पालखीचे स्वागत करण्याचे भाग्य लाभणार

# पुणे जिल्ह्यात धरणांतून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्याची शक्यता; सतर्कतेचा इशारा

**पुणे ।प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात हवामान खात्याने मुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) जारी केला आहे. यामुळे मुळा, मुठा आणि पवना नदीच्या काठावरील नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जलसंपदा विभागाच्या खडकवासला पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सातत्याने पाऊस सुरू असल्याने धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा येवा होत आहे. परिणामी, धरणातील पाणीसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी आज, दि. १५ जुलै २०२५ रोजी मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्याची शक्यता आहे.



पावसाच्या तीव्रतेनुसार विसर्गात टप्प्याटप्प्याने वाढ होण्याची शक्यता विभागाने वर्तवली आहे. यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीकाठावरील नागरिकांना नदीपात्रात असलेली वाहने, जनावरे किंवा इतर साहित्य तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, सर्व नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जलसंपदा विभागाने संबंधित प्रशासकीय विभागांना तात्काळ माहिती देऊन आवश्यक खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत. मध्यवर्ती पूर नियंत्रण कक्षाच्या संनियंत्रण अधिकारी श्वेता कु-हाडे यांनी याबाबत स्थानिक प्रशासनाला सज्ज राहण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनीही प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून स्वतःची आणि आपल्या मालमत्तेची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नव्या समाविष्ट गावांतील मिळकत करासंदर्भात राज्यमंत्री मिसाळ यांचं महत्त्वाचं विधान; म्हणाल्या, 'नवीन चार्ट तयार'

**पुणे । प्रतिनिधी**

**महापालिका हद्दीत समाविष्ट गावांतील मिळकत करासंदर्भात नवीन चार्ट तयार करण्यास सांगण्यात आले आहे, अशी माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली. आमदार भीमराव तापकीर यांनी समाविष्ट गावांतील विविध प्रश्नांवर विधी मंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी मांडली. गावांत आकारला जाणारा मिळकत कर, पाणी पुरवठा, रस्ते आदी विषयांचा यात समावेश होता.**

पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट ३२ गावांमधील मिळकत कर पूर्वीच्या ग्रामपंचायतींच्या कराच्या तुलनेत दुप्पट आकारला जात आहे. यावर तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार वसुली स्थगित ठेवण्याचे निर्देश असतानाही प्रत्यक्षात नागरिकांना मोठ्या प्रमाणावर बिले मिळत असल्याचे आमदार तापकीर यांनी निदर्शनास आणले. त्यासाठी महादेव बाजीराव धावडे या मिळकतदाराला आलेल्या सुमारे ५९ लाख रुपये बिलाचा उल्लेखही त्यांनी केला.

यासंदर्भात राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले की, 'नवीन कर चार्ट तयार करण्याचे निर्देश महापालिकेला देण्यात आले असून, कोणतीही सक्तीची वसुली होत नाही. तसेच इतर प्रश्नावर उत्तर देताना मिसाळ म्हणाल्या, 'कोविड काळात कंत्राटी काम करणाऱ्या सेवकांच्या संदर्भात विभागीय चौकशी समितीचा अहवाल मिळाल्यानंतर याबाबत बैठक घेण्यात आली असून, महापालिकेचा अभिप्राय मागवण्यात आला आहे'.

तसेच अतिवृष्टीमुळे पडलेल्या सिमाभिंती बांधण्याच्या कामासाठी फेरनिविदा मागविण्यात आल्या आहेत. समाविष्ट ११ गावांतील पाणी पुरवठ्यासाठी महापालिकेने सहाशे कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठवला आहे. त्याचा विचार नगरोत्थान योजनेत केला जाईल, अशी उत्तरे त्यांनी इतर प्रश्नांवर दिली.

### आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमली धोरणात्मक समिती

वारजे परिसरातील राष्ट्रीय महामार्गालगतच्या सर्व्हिस रस्त्यांचे भूसंपादन, क्रेडिट पॉलिसीमुळे प्रलंबित प्रकरणे, आणि जकात नाका-गणपती माता रस्ता (३० मीटरचा) यासाठी ५६ कोटींच्या निधीची मागणी तापकीर यांनी केली. त्यावर मिसाळ यांनी रस्त्यांच्या टीडीआर व कॅश कॉम्पोनन्ट यासंबंधी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली धोरणात्मक समिती नेमण्यात आली असून तिचा अहवाल प्राप्त झाल्यावर रस्त्यांचे नियोजन पूर्ण होईल, असे उत्तर दिले.

# पुणे विद्यापीठात विद्यार्थी आक्रमक, बॅरिकेट्स तोडून कुलगुरुंच्या कार्यालयाकडे घुसण्याचा प्रयत्न; पोलीस धावले

पुणे । प्रतिनिधी

देशात दिल्लीतील जवाहरलाल नेहरु विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या आंदोलनासाठी नेहमीच चर्चेत असते, त्याचप्रमाणे आता पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ देखील विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे चर्चेत येत आहेत. आज विद्यापाठातील मुख्य इमारतीच्या समोर येऊन विद्यार्थ्यांनी आक्रमकपणे आंदोलन सुरू केल्याचं पाहायला मिळत आहे. मोठ्या संख्येने इंजीनियरिंगचे विद्यार्थी मुख्य इमारतीच्या समोर बसून आंदोलन करत असून आमच्या मागण्या मान्य झाल्याचं पाहिजेत, कुलगुरुंनी येऊन आमची भेट घ्यावी, अशा घोषणाही देत आहेत. इंजिनिअरींगची पुनर्परीक्षा घ्यावी आणि कॅरी ऑनची प्रमुख मागणी या विद्यार्थ्यांकडून केली जात आहे.



इंजिनिअरिंग परीक्षेचा निकाल काही दिवसांपूर्वी जाहीर झाला. मात्र, या निकालातील बऱ्याच निकालांमध्ये घोळ असल्याचे देखील विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांकडून होत असलेल्या या आंदोलनात विद्यार्थी आक्रमक झाले असून बॅरिकेट्स तोडून ते विद्यापीठातील कुलगुरुंच्या कार्यालयाकडे जात असल्याचे दिसून आले. यावेळी, पोलिसांनी त्यांना अडवले मात्र आपल्या मागण्यासाठी विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. केवळ एका विषयासाठी आमचं संपूर्ण वर्ष वाया जाऊ नये, त्यामुळे आम्हाला कॅरी ऑन देण्यात यावा अशी मागणी करत विद्यापीठातील इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी इतरही विभागाचे सर्व विद्यार्थी एकत्र जमले असून हे आंदोलन अधिक आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे. कुलगुरुंनी आम्हाला १० मिनिटांचा वेळ दिला होता, १० मिनिटांत ते आमच्यापर्यंत येणार होते. मात्र, ते आमच्या मागण्या ऐकून घेण्यासाठी न आल्यामुळे आम्ही आतमध्ये शिरलो, असेही विद्यार्थ्यांनी बोलताना म्हटले. दरम्यान, या विद्यार्थ्यांचे एक शिष्ट मंडळ कुलगुरूंना भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गेले होते. त्यावेळी, विद्यापीठाच्यावतीने एका प्रतिनिधीसोबत विद्यार्थ्यांची चर्चा झाली असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांचे आंदोलन दोन दिवसासाठी स्थगित करण्यात आलं आहे. विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना दोन दिवसांचा वेळ मागण्यात आला होता. त्यानुसार, विद्यापीठ प्रतिनिधींशी चर्चा झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी दोन दिवसासाठी आपलं आंदोलन स्थगित केलं आहे. त्यामुळे, पुढील २ दिवसांनंतर आंदोलनाची दिशी ठरवली जाऊ शकते,

दरम्यान, कॅरी ऑनच्या प्रमुख मागणीसाठी विद्यार्थी आज सकाळपासून आंदोलन करत होते, त्यात निकालातही काही त्रुटी असल्याचे अनेक विद्यार्थ्यांनी आंदोलनावेळी बोलताना म्हटले आहे. त्यामुळे, अनेक मागण्यांसाठी हे आंदोलन होते.

# शिरूर तालुक्यात रेशन दुकानात महिलेसोबत लज्जास्पद वर्तन; जीवे मारण्याची धमकी

(शिरूर): शिरूर तालुक्यातील करडे गावात रेशन दुकानात रेशन घेण्यासाठी गेलेल्या एका २८ वर्षीय अल्पसंख्याक समाजातील महिलेसोबत दुकानदाराने लज्जास्पद वर्तन करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




ही घटना रविवारी, १३ जुलै २०२५ रोजी दुपारी १२:३० च्या सुमारास घडली. तक्रारदार महिला आपल्या दोन मुलांसह करडे गावातील शिवाजी सदाशिव बांदल यांच्या रेशन दुकानात रेशन घेण्यासाठी गेल्या होत्या. रेशन घेत असताना दुकानदार शिवाजी बांदल याने त्यांच्या पाठीमागून येऊन त्यांना मिठी मारत छेडछाड केली. या अचानक घडलेल्या लज्जास्पद प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने आरडाओरड केली. त्यावेळी आरोपीने तू नेहमी रेशन घ्यायला ये, मला पैसे नको, असे अश्लील बोलून तिचा विनयभंग केला. आरोपीने जर तू पोलिसांत तक्रार केलीस, तर तुला आणि तुझ्या मुलांना जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी दिली. या घटनेमुळे महिलेला मानसिक धक्का बसल्याने त्या दिवशी तक्रार दाखल झाली नाही. मात्र, दुसऱ्या दिवशी, सोमवारी (१४ जुलै २०२५) शिरूर पोलीस ठाण्यात महिलेच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक सागर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. आरोपीविरुद्ध लज्जास्पद वर्तन (विनयभंग) आणि जीवे मारण्याची धमकी या कलमांअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.